# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६ / आषाढ १२, १९४८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(४)** | **अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३०**

---

**राज्यात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढत असल्याबाबत**

**(१) * ३२३५७ श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.विलास तरे (बोईसर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.तुकाराम काते (चेंबूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय रुग्णालयांच्या परिसरात स्वच्छता व रुग्णांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत शासनाने नियमावली तयार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १९ मे, २०२६ रोजी वा त्या दरम्यान रुग्णालय परिसर भटक्या कुत्र्यांपासून मुक्त करण्याचे आणि आदेश डावलणाऱ्या अधिकाऱ्यांवर अवमानतेची कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिले असतानाही कूपर रुग्णालयात या नियमांची काटेकोर अंमलबजावणी झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अहिल्यानगर येथे भटक्या कुत्र्यांची समस्या तीव्र जाणवत असून शाळेतील विद्यार्थी, लहान मुले, वृद्ध व महिला यांच्यावर कुत्र्यांकडून वारंवार हल्ले होत असून अहिल्यानगर जिल्ह्यात चालू वर्षात माहे फेब्रुवारी, २०२६ अखेर ३९ हजार ३२३ जणांना कुत्र्याने चावा घेतल्याची घटना माहे मार्च, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी कुत्रा चावण्याच्या घटनेत २ हजार १०१ जणांची वाढ झाल्याचे समोर आले असून चावा घेण्याच्या घटना, अस्वच्छता व संसर्गाचा धोका वाढल्याने रुग्ण, नातेवाईक व कर्मचारी यांच्यात भितीचे वातावरण निर्माण झाले आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, चंदनझिरा परिसरातील पंचशीलनगर (जि.जालना) येथे पिसाळलेल्या भटक्या कुत्र्याच्या हल्ल्यात श्री.गौरव सुहास खरात हा चार वर्षीय बालक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, जालना महानगरपालिकेमार्फत मोकाट कुत्र्यांच्या निर्बिजीकरण व लसीकरण मोहिमेची अंमलबजावणी अत्यंत संथ गतीने होत असून ३२० दिवसांत केवळ १ हजार ७०७ शस्त्रक्रिया करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, अमळनेर (जि.जळगाव) शहरात सार्वजनिक रस्त्यांवर मोकाट गुरांचा सुळसुळाट वाढल्याने नागरिकांना मोठा त्रास होत असून, वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले असून रस्त्यावर मोकाट फिरणाऱ्या लहान वासरांवर भटक्या कुत्र्यांकडून हल्ले होऊन एका आठवड्यात सुमारे ५ वासरांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(८) असल्यास, पालघर जिल्ह्यात पालघर, वसई विरार, डहाणू, बोईसर, जव्हार आणि वाडा परिसरात भटक्या श्वानांचा उपद्रव अधिक वाढल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात असून गेल्या आर्थिक वर्षात २ जणांचा रेबीजमुळे मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, तसेच गेल्या ५ वर्षात तब्बल ४७ हजारहून अधिक नागरिकांना श्वानदंश झाल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(९) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करून राज्यातील भटक्या कुत्र्यांची संख्या कमी करणे, निर्बीजीकरण व रेबीज लसीकरण कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे तसेच श्वान दंशामुळे मृत पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या डॉ.रु.न.कुपर रुग्णालयात भटक्या श्वानांचा वावर कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. सदर रुग्णालयामध्ये वावर करणाऱ्या श्वानांचे निर्बिजीकरण व रेबीज लसीकरण बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येते.
(३) हे खरे आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.

सन २०२६ मध्ये अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये माहे जानेवारी ते फेब्रुवारी, २०२६ मध्ये ७२३० श्वानदंश रुग्णांची नोंद झालेली आहे. त्यानुसार मागील वर्षीच्या तुलनेत श्वानदंश रुग्णांमध्ये ४६३ ने वाढ झाल्याचे दिसून येते.
(५) हे खरे आहे.
(६) हे खरे नाही.

जालना महानगरपालिकेमध्ये मोकाट श्वानाच्या निर्बिजीकरण व लसीकरण मोहिमेकरिता जालना महानगरपालिकेकडून दि.२६ मे, २०२५ रोजी साई एजन्सी यांची नियुक्ती करण्यात आली. परंतु निर्बिजीकरण केंद्राचे काम सुरु असल्यामुळे सदरची मोहिम दि.३१ ऑगस्ट, २०२५ पासून सुरु करण्यात आली. सदर मोहिमेला अद्याप ३२० दिवस पूर्ण झालेले नसून दि.२८ मे, २०२६ पर्यंत २२४५ इतक्या मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण व लसीकरण जालना महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.
(७) हे खरे नाही.

अमळनेर शहरात सार्वजनिक रस्त्यावर मोकाट गुरांचा सुळसुळाट होऊन नागरिकांना त्रास होण्याची, वाहतुकीला अडथळा निर्माण होण्याची कोणतीही घटना / प्रसंग अमळनेर नगरपरिषद हद्दीत घडलेली नाही.
(८) हे खरे आहे.
(९) मा. सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांच्या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने नगर विकास विभाग, शासन परिपत्रक दि.२४ नोव्हेंबर, २०२५ अन्वये राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना तसेच ग्राम विकास व पंचायत राज विभाग, शासन परिपत्रक दि.२७ नोव्हेंबर, २०२५ अन्वये राज्यातील सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच, केंद्र शासनाच्या प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३ मधील तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना नगर विकास विभाग, शासन निर्णय दि.२० मार्च, २०२५ अन्वये तर राज्यातील सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना ग्राम विकास व पंचायत

राज विभाग, शासन परिपत्रक दि.२६ नोव्हेंबर, २०२५ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत. त्यांनुसार राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, याबाबत विविध स्तरावरून बैठकांच्या माध्यमांतून आढावा घेण्यात आला असून आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मा. सर्वोच्च न्यायालय प्रकरणी राज्यातील सर्व विभागांचे समन्वय पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येत असून त्यांच्याकडून याबाबतीत वेळोवेळी प्राप्त सूचनांनुसार विभागांमार्फत कार्यवाही करण्यात येते.

-----------------

## मुंबईतील 'हाफकिन बायोफार्मा' संस्थेची आर्थिक स्थिती सक्षम करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२) * ३४०७२ श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश बालदी (उरण), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील १३५ वर्षांची परंपरा व जगातील १३० हून अधिक देशांना लस पुरवणारी तसेच पोलिओ, धनुर्वात, डांग्या खोकला आणि घटसर्प यांसारख्या जीवनावश्यक लसींचे उत्पादन करणारे 'हाफकिन बायोफार्मा' या विश्वासार्ह संस्थेचे खाजगीकरण करण्याच्या प्रस्तावाच्या विरोधात कर्मचारी व विविध संघटनांनी माहे एप्रिल,२०२६ मध्ये आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संस्थेचे खाजगीकरण झाल्यास भविष्यात लसींचे दर मोठ्या प्रमाणावर वाढून सर्वसामान्य जनतेला आरोग्य सेवा आर्थिकदृष्टया परवडणार नसून सदर संस्थेत त्रिगुणी लस निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या प्रयोगशाळेचे अद्यावतीकरण गेली २४ वर्षे निधीअभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थेत विविध संवर्गातील पदे दिर्घकाळापासून रिक्त असल्याने त्याचा प्रतिकूल परिणाम कामकाजावर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लसीची "सीड स्ट्रेन" कोणत्याही खाजगी कंपनीला देण्याऐवजी हाफकिन महामंडळाने स्वत: लसीचे उत्पादन सुरु करावे अशी शिफारस माशेलकर समितीच्या अहवालात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार 'हाफकिन बायोफार्मा' या संस्थेचे खाजगीकरण करण्याऐवजी संस्थेची आर्थिक स्थिती सक्षम करण्यासाठी आवश्यक असलेला निधी व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादित हे देशातील शासकीय लस उत्पादक संस्थापैकी एक महत्वाचे व १०० वर्षाचा इतिहास असलेले महामंडळ असून सन २००७ पासून "त्रिगुणी (DPT) लसीचे" उत्पादन करण्यासाठी अद्ययावत उत्पादन प्रकल्प उपलब्ध नसल्यामुळे DPT लसीचे उत्पादन पूर्णपणे बंद झालेले आहे. हाफकीन औषध जीव निर्माण महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीत (Agenda Item no. ६) त्रिगुणी (DPT) लसीच्या उत्पन्नासाठी संयुक्त भागीदारी (Joint Venture) तत्वावर

बाजारातील मागणी व इच्छुक कंपन्यांची संख्या जाणून घेण्यासाठी Expression of Interest (EOI) जाहीर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, महामंडळाकडून ग्लोबल EOI जाहिरात दिनांक १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी वर्तमानपत्रात देण्यात आली होती.

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाने सुरु केलेल्या उपरोक्त प्रक्रियेविरोधात काही संघटनांनी एप्रिल, २०२६ मध्ये आंदोलन केले होते.

सदर ग्लोबल EOI चा उद्देश संयुक्त उत्पादन (Joint Venture) पद्धतीने महामंडळास कायमस्वरूपी उत्पन्नाचा स्त्रोत उपलब्ध होऊ शकतो का, याबाबत प्राथमिक चाचपणी करण्याचा होता. सदर ग्लोबल EOI ला केवळ "Reliance Life Science" या एकाच कंपनीकडूनच स्वारस्य दर्शविण्यात आले होते. हाफकीन औषध जीव निर्माण महामंडळाच्या संचालक मंडळाच्या २५२ बैठकीत (Agenda Item no. १७) सदर ग्लोबल EOI मान्य करण्यात आलेला नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) हाफकीन जीव-औषध निर्माण महामंडळाचे एकूण मूल्यमापन करून महामंडळाचा सर्वांगिण विकास कसा होईल याबाबत उपाययोजना सुचविणेबाबत शासनाने दिनांक ६.०६.२०१७ रोजी डॉ.आर. ए.माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती स्थापन केली होती. सदर समितीने अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पाच प्रकल्पाकरीता (निर्जिवित बाल पक्षाघात, पंचगुणी लस, उतीवर्धित श्वानदंशलस, पिंपरी, पुणे येथील प्रतिविष व रक्तजल उत्पादन विभागाचे अद्ययावत तंत्रज्ञानाच्या आधारे आधुनिकीकरण, जैव संयोजित रक्तघटकांधारीत घटक ८ व ९) उत्पादन संयंत्राचे अत्याधुनीकरण व उन्नतीकरण करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रकल्पनिहाय वित्तीय सहाय्य करण्याची शिफारस केली होती. सदर शिफारशीमध्ये उक्त पाच प्रकल्पाकरीता रु.११०० कोटी इतक्या निधीची आवश्यकता असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने रु.१०० कोटी व उर्वरीत निधी केंद्र शासनाने भाग भांडवल म्हणून वित्तीय सहाय्य उपलब्ध करून देण्याबाबत नमूद केले आहे.

हाफकीन जीव-औषध निर्माण महामंडळाने निर्जिवित बाल पक्षाघात लस या प्रकल्पाकरीता रु. ५० कोटी व पिंपरी, पुणे येथील प्रतिविष व रक्तजल उत्पादन विभागाचे अद्ययावत तंत्रज्ञानाच्या आधारे आधुनिकीकरण करण्याकरीता रु.१०० कोटी असे एकूण रु.१५० कोटी निधी उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अभिप्राय देण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आली होती. वित्त विभागाने त्रुटी पूर्तता करण्याबाबत कळविले असून त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

हाफकीन जीव-औषध निर्माण महामंडळाची आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्याबाबत नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## 'स्टिंग' एनर्जी ड्रिंकमुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत

**(३) * ३९०६५ श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोशल मिडीया व वृत्तवाहिन्यांवर मोठ्या प्रमाणावर जाहिरात करण्यात येणाऱ्या "स्टिंग" एनर्जी ड्रिंकच्या अतिसेवनामुळे हृदयाचे ठोके अचानक वाढून अहिल्यानगरमधील श्रीगोंदा, पाथर्डी येथे मुलांचा मृत्यू झाल्याच्या प्राथमिक घटना निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'स्टिंग' एनर्जी ड्रिंकमध्ये विद्यार्थ्यांच्या आरोग्यास हानी पोहोचवणारे कॅफिन (Caffeine), अतिप्रमाणातील साखर आणि कृत्रिम रंग (Carmoisine) यांसारखी घातक रसायने व घटक किती प्रमाणात आढळतात याची अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने (FSSI) तपासणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळकरी मुले आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये या पेयाच्या अतिसेवनामुळे हृदयविकार, निद्रानाश, किडनीचे आजार आणि अलीकडेच काही विद्यार्थ्यांचा/तरुणांचा संशयास्पद मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने या पेयाच्या बाटलीवर "लहान मुलांसाठी शिफारस केलेली नाही" (Not recommended for children) असा इशारा असूनही त्याची सर्रास विक्री होत असल्याने शाळा-कॉलेजच्या कॅन्टीनमध्ये व कॅम्पस परिसरात यावर पूर्ण बंदी घालण्यासाठी आणि याच्या जाहिरातींवर निर्बंध आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ तसेच याअंतर्गत नियम व नियमने यामध्ये एनर्जी ड्रिंक्स या अन्नपदार्थाची व्याख्या दिलेली नाही. परंतु अन्न सुरक्षा व मानके (फूड प्रॉडक्ट्स अॅन्ड फूड अॅडीटिव्हज) २०११ चे नियमन २.१०.६ अन्वये बेव्हरेजेस नॉन-अल्कोहोलीक या अन्नपदार्थासाठी मानके नमूद केली आहेत. सदर नियमनात कार्बोनेटेड वॉटर, कॅफिनेटेड बेव्हरेजेस (कार्बोनेटेड, नॉन कार्बोनेटेड), नॉन कार्बोनेटेड वॉटर बेस्ड बेव्हरेजेस (नॉन-अल्कोहोलीक) साठी मानके निश्चित केली असून त्यात caffeine या घटक पदार्थाचे प्रमाण नमूद केले आहे.

अन्न सुरक्षा व मानके (फूड प्रॉडक्ट्स अॅन्ड फूड अॅडीटिव्हज) २०११ चे नियमन २.१०.६.१ नुसार कार्बोनेटेड वॉटर मध्ये कॅफीनचे प्रमाण १४५ पीपीएमपेक्षा जास्त नसावे असे नमूद केले आहे. अन्न सुरक्षा व मानके (फूड प्रॉडक्ट्स अॅन्ड फूड अॅडीटिव्हज) २०११ चे नियमन २.१०.६.२ (ii) अन्वये कॅफिनेटेड बेव्हरेजेस (कार्बोनेटेड, नॉन कार्बोनेटेड) मध्ये कॅफिन चे प्रमाण कमीत कमी १४५ मिली ग्रॅम प्रति लिटर आणि जास्तीत जास्त ३०० मिलि ग्रॅम प्रती लिटर असावे अशी तरतूद नमूद आहे.
(३) व (४) अन्न व औषध प्रशासनाच्या दि.३.१०.२०२४ व दि.१७.०१.२०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार शैक्षणिक संस्थेपासून किमान ५०० मीटरच्या परिसरात Beverages Non Alchoholic (Energy Drinks) या अन्न पदार्थाची विक्री करणाऱ्या आस्थापनांची तपासणी करून अन्न नमुने विश्लेषणासाठी घेणे व आक्षेपार्ह जाहिरातीविरुद्ध कारवाई करणेबाबत प्रशासनाने परिपत्रक निर्गमित केलेले आहे. Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulations २०११ चे नियमन २.१०.६.२ (V) (b) मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे.

Prominent display of caution "Not recommended for children, pregnant or lactating women, persons sensitive to caffeine. सदर तरतुदीनुसार Caffeinated Beverages च्या सेवनाची मुलांसाठी शिफारस केलेली नाही. राज्यात एप्रिल २०२५ ते मे २०२६ या कालावधीत स्टिंग एनर्जी ड्रिंक्स या अन्न पदार्थाचे एकूण २७ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून १० नमुने प्रमाणित घोषित करण्यात आले असून उर्वरित १७ अन्न नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहे. राज्यात एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत एनर्जी ड्रिंक्स या अन्न पदार्थाचे एकूण ११५ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून ६३ अन्न नमुने प्रमाणित, १ नमुना कमी दर्जा, ६ अन्ननमुने मिथ्याछाप घोषित केले असून ४५ अन्न नमुन्याचे अहवाल प्रलंबित आहेत. तसेच कमी दर्जा व मिथ्याछाप अन्ननमुने प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ च्या कलम ६८ नुसार २ न्यायनिर्णय अर्ज व कलम ६९ नुसार ३ तडजोड अर्ज दाखल केलेले असून उर्वरित २ प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील मनोरी येथील खारे पाणी गोडे करण्याच्या प्रकल्पास मंजुरी देण्याबाबत**

**(४) * ३२५२६ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईला दररोज सात धरणांतून चार हजार दशलक्ष लिटर पाणीपुरवठा केला जात असून वाढती गरज भागवण्यासाठी मुंबई महापालिकेने मनोरी येथे खारे पाणी गोडे करण्याचा निःक्षारीकरण प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी कंत्राटदाराची (जीव्हीपीआर इंजिनिअर्स लि.) निश्चिती झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खारे पाणी गोड करण्याच्या मनोरी नि:क्षारीकरण प्रकल्पासाठी महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापनाची अद्याप अंतिम मंजुरी मिळाली नसल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मंजुरी न मिळाल्यामुळे गेल्या तीन-चार वर्षांपासून हा प्रकल्प निविदा प्रक्रियेत अडकला असून प्रकल्पाचा अपेक्षित खर्च ३५२० कोटी रुपयांवरून साधारण एक हजार कोटींनी वाढून ४५२० कोटी रुपयांवर पोहोचला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर प्रकल्पामुळे मालाड, गोरेगाव, बोरीवली, दहिसर आणि कांदिवली यांसारख्या पश्चिम उपनगरातील महत्त्वाच्या विभागांची पाण्याची सोय होणार असून सदर प्रकल्पाला महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडून तातडीने मंजुरी मिळवून देण्यासाठी तसेच प्रकल्पाच्या प्रत्यक्ष बांधकामाला लवकरात लवकर सुरुवात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने मनोरी येथे खारे पाणी गोडे करण्याचा नि:क्षारीकरण प्रकल्प करण्याचा फेब्रुवारी, २०२१ मध्ये निर्णय घेतला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकल्प संयुक्त भागीदारीद्वारे विकसित करण्यात येत असून याकरीता मे. जीव्हिपीआर इंजिनिअर्स लिमिटेड - मे. आय.डी.ई.टेक्नॉलॉजी लि. संयुक्त भागीदारी उपक्रम (Joint Venture) यांची नेमणूक करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

प्रकल्पासाठी महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांची दिनांक ७ एप्रिल, २०२६ रोजी तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल विभागाची किनारपट्टी नियमन क्षेत्र (CRZ) बाबत दिनांक ११ मे, २०२६ रोजी मंजूरी प्राप्त झाली आहे.

(४) हे खरे नाही.

कंत्राटदारास कार्यादेश दिल्यापासून ६ महिन्याच्या कालावधीत आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्या असून निविदेअंती प्रकल्प बांधकामाची किंमत रुपये ४०७७ कोटी इतकी आहे. त्यामध्ये कोणतीही वाढ झालेली नाही.

(५) सदर प्रकल्पासाठी निविदाकारास दिनांक १५ डिसेंबर, २०२५ रोजी कार्यादेश देण्यात आले. तसेच प्रकल्पासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या प्राप्त झाल्या आहेत.

कार्यादेशानुसार प्रकल्प बांधकाम पूर्ण होण्याचा कालावधी ४८ महिने इतका आहे. तसेच प्रचलन व परिचालन (Operation and Maintenance) कालावधी २० वर्षाचा आहे.

-----------------

## अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(५) * ३४३७६ श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सोलापूर, नाशिक, अकोला, अहिल्यानगर, लातूर व ठाणे या जिल्ह्यांतील काही शाळांचे ऑनलाईन पोर्टल हॅक करून सुमारे ५० अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे बनावट अर्ज दाखल करून रुपये ३,६१,४०० इतकी रक्कम जमा करण्यात आल्याची घटना माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने सबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित विद्यार्थ्यांना नुकसानभरपाई अथवा शिष्यवृत्तीची परतफेड करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनामार्फत धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना सुरु केली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी शिक्षण संचालक (योजना) पुणे यांच्यामार्फत करण्यात येते. केंद्र शासनाने दि.२१.०३.२०२५ रोजी सदर योजनेसंदर्भात संशयास्पद संस्था/शाळांची तपासणी करणेबाबत निर्देशत करण्यात आले आहे. त्यामध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ मध्ये राज्यातील अहिल्यानगर, अकोला, लातूर, नाशिक व ठाणे जिल्ह्यात ५ शाळांतील ५० विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणीमध्ये बनावट आढळून आले आहेत.

(२) व (३) त्याबाबत संबंधित सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुध्द दि.७/७/२०२५, दि.२०/४/२०२६, दि.२९/५/२०२६, दि.२३/५/२०२६ व दि.४/६/२०२६ रोजी एफआयआर दाखल करण्यात आला असून सायबर पोलीसांकडून तपासणीची पुढील कार्यवाही सुरु आहे. सदर शिष्यवृत्तीच्या वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगणघाट शहरातील नांदगाव चौकातील उड्डाणपुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(६) * ४०२४१ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट शहरातील नांदगाव चौकातील उड्डाणपुलाला पूल सुरू झाल्यापासून अवघ्या दोन वर्षांच्या आत भगदाड पडल्याची आणि गत ३ वर्षांत तब्बल ६ वेळा भगदाड पडल्यामुळे उड्डाणपूल वाहतुकीसाठी बंद करावा लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी एकूण किती निधी मंजूर करण्यात आला असून प्रत्यक्षात किती निधी खर्च करण्यात आला आहे,

(३) असल्यास, सदर उड्डाणपुलाच्या बांधकामाचा दर्जा निकृष्ट असून वारंवार भगदाड पडत असल्याने जीवघेणी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पुलाच्या दुरुस्तीकरिता खर्च करण्यात आलेल्या निधीची संपूर्ण रक्कम किती आहे तसेच सदरच्या खर्चाचा तपशील उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(५) असल्यास, पुलाचे बांधकाम करण्यासाठी शासनाकडून आलेली मंजुरीची प्रत तसेच संपूर्ण बांधकाम प्रक्रियेत समाविष्ट असलेले सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांचा संपूर्ण तपशील काय आहे,

(६) असल्यास, निकृष्ट बांधकाम करणाऱ्या संबंधित कंत्राटदार कंपनीला काळ्या यादीत (Blacklist) टाकून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित कंत्राटदारांवर तसेच कंत्राटदाराला पाठीशी घालणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१), (२), (३) व (४) मनसर-नागपूर-हिंगणघाट-पांढरकवडा हा राष्ट्रीय महामार्ग ४४ असा वर्गीकृत असून सदर मार्गावरील हिंगणघाट- नांदगाव जंक्शन येथील उड्डाणपुलाचे काम EPC तत्वावर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत एप्रिल २०२१ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे. सदर उड्डाणपूलाच्या प्रकल्पास १२२ कोटी रू. इतका निधी मंजूर होता व एकूण प्रकल्प खर्च ६६.५६ कोटी झाला आहे. सदर कामाचा दोषदायित्व कालावधी ४ वर्षे होता.

सदर उड्डाणपुलामध्ये एकूण १७ स्पॅन असून त्यापैकी एका स्पॅनमध्ये मे २०२४ मध्ये कॉंक्रीटचे स्पॉलिंग आढळून आले होते. दोषदायित्व कालावधीमध्ये संबंधित कंत्राटदारामार्फत त्याची दुरुस्ती करून घेण्यात आली. दोषदायित्व कालावधी पूर्ण झाल्यानंतर सदर उड्डाणपूल नवीन Concessionaire कडे (NHIT) हस्तांतरित करण्यात आला.

तथापि, तदनंतर जून २०२५ मध्ये देखील त्याच स्पॅनच्या दुसऱ्या भागामध्ये स्पॉलिंग आढळून आल्याने नवीन Concessionaire मार्फत (NHIT) सदर स्पॅनची सविस्तर तपासणी केली असता तपासणी निष्कर्षानुसार दीर्घकालीन उपाययोजना म्हणून सदर स्पॅनमधील संपूर्ण डेक स्लॅब बदलण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार आवश्यक तांत्रिक तपासणी करून संबंधित स्पॅनचे कायमस्वरूपी दुरुस्तीचे काम नवीन Concessionaire मार्फत (NHIT) स्वखर्चाने करण्यात येत आहे. सदर दुरूस्तीचे काम ऑगस्ट, २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) हिंगणघाट उड्डाणपुलाच्या कामास भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत सन २०१७ मध्ये रू. १२२ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.
(६) उड्डाणपुलाच्या कामाच्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदार मे. विद्या इन्फ्रा बिल्ड प्रा. लि. यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

-----------------

## खाद्यपदार्थांच्या पाकिटांवर फॅट्सच्या प्रमाणाचा स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे ग्राहकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याबाबत

**(७) * ३३८८७ श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांच्या पाकिटांवर साखर, मीठ आणि फॅट्सच्या प्रमाणाबाबत स्पष्ट ‘फ्रंट ऑफ पॅक - न्युट्रीशन लेबलिंग’ (FOPNL) नसल्यामुळे ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ‘फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड्स ॲथॉरिटी ऑफ इंडिया’ (FSSAI) च्या उक्त धोरणास अन्न प्रक्रिया उद्योगांकडून विरोध होत असला तरी जनतेच्या हितासाठी शासन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील नागरिकांच्या आरोग्य रक्षणासाठी शासन अन्न सुरक्षेच्या बाबतीत विशेष नियमावली किंवा जनजागृती मोहीम राबवणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने अशा उत्पादनांच्या बाबतीत ग्राहकांना योग्य निवड करता यावी यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) व (२) अन्नपदार्थांवरील लेबलिंगबाबतची तरतूद ही अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ तसेच त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या Food Safety and Standards (Labelling and Display) Regulations, २०२० मध्ये नमूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांच्या लेबलवर पोषणमूल्यविषयक माहिती (Nutritional Information) देणे बंधनकारक आहे.

ग्राहकांना अन्नपदार्थांची पोषणमूल्यविषयक माहिती अधिक सुलभ व स्पष्टपणे उपलब्ध व्हावी, हा शासनाचा उद्देश आहे. त्यासाठी Front of Pack - Nutrition Labelling (FOPNL) संदर्भातील अंतिम धोरण निश्चित करण्याचा अधिकार भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI), नवी दिल्ली यांच्याकडे असल्याने शासनाकडून सदर तरतूद लागू करण्याबाबत अन्न व सुरक्षा मानके प्राधीकरणाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) राज्य शासनामार्फत अन्न व औषध प्रशासन विभागाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये सुरक्षित व आरोग्यदायी जनजागृती करण्यासाठी आहाराबाबत विविध उपक्रम खालील प्रमाणे राबविण्यात येत आहेत:

१. शाळा, महाविद्यालये व सार्वजनिक संस्थांमध्ये अन्न सुरक्षा व पोषणविषयक कार्यशाळा व जनजागृती कार्यक्रम.
२. 'Eat Right India' अभियानांतर्गत विविध उपक्रम जसे Eat Right School, Eat Right Campus इ.
३. अन्न व्यावसायिकांना FoSTaC (Food Safety and Training Certification) या उपक्रमांतर्गत सुरक्षित व आरोग्यदायी अन्न पदार्थ उत्पादन, विक्री व हाताळणीबाबत प्रशिक्षण.

(४) अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत अन्नपदार्थांच्या लेबलिंगसंबंधी तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनामार्फत नियमित तपासण्या करून अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केज (जि.बीड) नगर पंचायतीत प्रधानमंत्री आवास योजनेत कोट्यवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(८) * ३२४५३ श्री.विजयसिंह पंडित (गेवराई), श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि.बीड) नगर पंचायतीत प्रधानमंत्री आवास योजनेत ५.८६ कोटी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणाच्या चौकशीचा अहवाल उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक ७ एप्रिल,२०२६ रोजी वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गैरव्यवहार प्रकरणात एकाच प्रकारचा समान गुन्हा करणाऱ्या तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांना समान शिक्षा देणे अपेक्षित असताना केवळ एका मुख्याधिकाऱ्याला वगळून इतरांवर गुन्हे दाखल करण्याची शिफारस अहवालात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रधानमंत्री आवास योजनेतील ३७४ पात्र लाभार्थ्यांवर झालेला अन्याय लक्षात घेता धनादेशावर स्वाक्षरी करणाऱ्या तत्कालीन सर्व मुख्याधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द समान न्याय धर्तीवर सर्वांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी केज पोलीस ठाणे येथे आरोपीच्या यादीत वगळलेल्या मुख्याधिकाऱ्यांचा समावेश शासन करणार आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता मा.राज्यमंत्री, नगरविकास यांनी या प्रकरणात दिनांक ५ मार्च, २०२६ रोजी सभागृहात दिलेल्या आश्वासनानुसार या प्रकरणाची एस.आय.टी. चौकशी करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने प्रधानमंत्री आवास योजनेतील ५.८६ कोटी रुपये व्याजासह वसुल करून पात्र लाभार्थ्यांना वाटपासाठी तसेच गेवराईच्या (बीड) स्थानिक लोकप्रतिनिधींनी या प्रकरणी दिनांक २० एप्रिल, २०२६ रोजी दिलेल्या निवेदनाबाबत शासनाने विशेषतः जिल्हाधिकारी, बीड, आयुक्त न.प.प्रशासन यांनी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे.

केज नगरपंचायत (जि.बीड) येथील प्रधानमंत्री आवास योजनेतील रु.४,२४,७३,०२३/- इतक्या रकमेच्या गैरव्यवहार प्रकरणी केलेल्या चौकशीचा अहवाल उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांनी दिनांक ७ एप्रिल, २०२६ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना सादर केला आहे.
(२) अंशतः खरे आहे.

चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालातील निष्कर्षानुसार तत्कालिन दोन मुख्याधिकारी यांचा सहभाग आढळून आला आहे. त्यापैकी एका मुख्याधिकाऱ्याची विभागीय चौकशी व एक मुख्याधिकारी व इतर कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हे व विभागीय चौकशीची शिफारस करण्यात आली आहे.
(३) जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून शासनास शिफारसीसह चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. सदरचा अहवाल तपासून शासन स्तरावर उचित निर्णय घेण्यात येत आहे.
(४) दिनांक ०५ मार्च, २०२६ रोजी मा.राज्यमंत्री महोदयांनी एस.आय.टी स्थापन करण्याचे आश्वासन दिले नसून आर्थिक गुन्हे शाखेमार्फत (EOW) तपास करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. त्यानुसार आर्थिक गुन्हे शाखा, बीड यांच्याकडून या प्रकरणाचा तपास सुरु आहे.
(५) उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालात प्रधानमंत्री आवास योजनेतील अपहारीत निधी व्याजासह वसूल करण्याबाबत कोणतेही भाष्य केलेले नाही. याबाबत राज्य शासनाच्या स्तरावर उचित निर्णय घेण्यात येत आहे.

आर्थिक गुन्हे शाखा, बीड मार्फत सदर गुन्ह्यातील सर्व फरार आरोपी यांना अटक करुन त्यांच्यावर मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची, तसेच तपासाअंती दोषी आढळणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध फौजदारी कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी/शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

-----------------

## रिहे (ता.मुळशी, जि.पुणे) येथे रिंगरोड भूसंपादनासाठी शेतकऱ्याच्या घरावर केलेली कारवाई

**(९) * ३७९५५ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रिंगरोड प्रकल्पासाठी पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील रिहे येथील शेतकरी श्री.विलास रामचंद्र शिंदे यांचा गोठा व पोल्ट्री शेड दिनांक १८ एप्रिल, २०२६ रोजी वा त्या दरम्यान महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत (MSRDC) बुलडोझरच्या सहाय्याने पाडण्यात आला असून दिनांक २० एप्रिल, २०२६ रोजी त्यांचे राहते घरही पाडण्यात आल्याचे माहे एप्रिल,२०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वे क्रमांक ५७८/४ ही जमीन न्यायप्रविष्ट असून न्यायालयाचा अंतिम निकाल लागल्यानंतरच संबंधित जमिनीचा मोबदला शिंदे कुटुंबास देण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरण न्यायालयीन प्रक्रियेत असताना प्रशासनाने संबंधित बांधकामांवर कारवाई करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बाधित शेतकरी कुटुंबास नुकसानभरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच, भूसंपादन प्रक्रियेदरम्यान न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये बाधित नागरिकांवर अशा प्रकारची कारवाई होऊ नये यासाठी कोणती मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली वा करण्यात येणार आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) सदर विवादित असलेल्या संपादन क्षेत्राचा मोबदला महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ च्या कलम १९ (क) (४) अन्वये मा.जिल्हा न्यायालय, पुणे येथे जमा करण्यात आला आहे.
(३) भूसंपादनाची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करुन नियमोचित कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) सदर बाधित शेतकऱ्यास अदा करावयाची मोबदल्याची रक्कम मा.जिल्हा न्यायालयात जमा करण्यात आलेली आहे.
(५) भूसंपादन प्रक्रियेदरम्यान मा.न्यायालयाची स्थगिती असल्यास स्थगिती संपुष्टात येईपर्यंत भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करता येत नाही. प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ट नसल्याने महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ अन्वये भूसंपादन प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर भूधारक व हरकतदार यांच्यामध्ये विवाद असल्याने संपादित क्षेत्राचा मोबदला भूसंपादन अधिकारी यांनी मा.जिल्हा न्यायालय, पुणे यांच्याकडे दि.०४.०७.२०२५ रोजी वर्ग केला आहे व त्यानंतर भूसंपादित जमीनीचा ताबा घेण्यात आला आहे.

-----------------

## मुंब्रा (जि.ठाणे) विभागातील झुबेदा पार्क या सोसायटीत घराचा स्लॅब कोसळून रहिवाशाचा झालेला मृत्यू

**(१०) * ३२३६४ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंब्रा (जि.ठाणे) विभागातील शिमला पार्क येथील झुबेदा पार्क या सोसायटीत दुसऱ्या मजल्यावरील घराचा दिनांक १९ एप्रिल, २०२६ रोजी वा त्या दरम्यान स्लॅब कोसळून रहिवाशाचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे महापालिका क्षेत्रात सुमारे चार हजारापेक्षा जास्त इमारती धोकादायक असल्याचे दिनांक ११ मे, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महापालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींमध्ये वास्तव्यास असलेल्या नागरीकांच्या सुरक्षिततेसंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सी-१ वर्गवारीतील धोकादायक इमारती तातडीने रिक्त करुन निष्कासित करणे आवश्यक असल्याने सी-१ वर्गवारीतील धोकादायक इमारती बळाचा वापर करुन रिक्त करण्यात येतात. सी-१

वर्गवारीतील इमारतीमधील सदनिकाधारक यांनी स्वतःच्या राहण्याची व्यवस्था स्वतः करणे अपेक्षित आहे. परंतु जे नागरिक स्वतःच्या राहण्याची व्यवस्था स्वतः करु शकत नाहीत अशा नागरिकांचे संक्रमण शिबिरात स्थलांतर करण्यात येत असून तात्पुरत्या स्वरुपात राहण्याची व्यवस्था करण्यात येते. तसेच, जे नागरिक स्वतःच्या राहण्याची व्यवस्था स्वतः करु शकत नाहीत अशा नागरिकांना घरभाडे देणेबाबत ठाणे महानगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेतला असून त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील बीकेसी परिसरात मेट्रो मार्गिकेच्या बांधकामस्थळी क्रेन कोसळून झालेला अपघात**

**(११)** * **३३४१३ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील बीकेसी परिसरातील सुरु असलेल्या डी एन नगर मेट्रो मार्गिकेच्या कामात कंत्राटदाराने कोणत्याही प्रकारे सुरक्षा उपाययोजना केल्या नसल्याने मेट्रोचे बांधकाम सुरु असताना क्रेन पडून अपघात झाल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीकेसी येथे सुरु असलेल्या मेट्रो २ बी मार्गीकेच्या आय एल एफ एस स्थानकाच्या बांधकामादरम्यान एशियन हार्ट हॉस्पीटल जक्शन जवळ ही घटना घडली असून स्थानकाच्या कामासाठी १८० टन वजनाचा प्रिकास्ट बीम बसविण्यासाठी वापर करण्यात आलेल्या दोन क्रेन पैकी एक क्रेन अपघातग्रस्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, दहीसर ते मिरा भाईदर मेट्रो ९ मार्गीकेच्या कामादरम्यान ट्रान्जीट मिक्सर खड्यात कोसळून श्री. जयकुमार या चालकाचा माहे डिसेंबर, २०२४ मध्ये घटनास्थळी मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

मुंबई मेट्रो मार्ग-२ब (डि. एन. नगर ते मंडाळे) या प्रकल्पाची स्थापत्य कामे प्रगती पथावर असून एशियन हार्ट हॉस्पिटल सिग्नल बीकेसी जवळ या प्रकल्पातील आय एल एफ एस (ILFS) या स्थानकाचे स्थापत्य बांधकाम सुरु आहे. दिनांक १५.०४.२०२६ रोजी सदर स्थानकाच्या प्लॅटफॉर्म लेवल प्री-कास्ट पोर्टल बीम उभारणीपूर्वी सर्व आवश्यक सुरक्षा उपाययोजना आणि तांत्रिक तपासण्या काटेकोरपणे पूर्ण करण्यात आल्या असून दोन्ही क्रेनची तसेच संबंधित उपकरणांची तपासणी करण्यात आली होती. कामाच्या स्वरूपाचा विचार करून संबंधित वाहतूक पोलिस विभागाशी समन्वय साधण्यात आला होता आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संबंधित रस्ता तात्पुरता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. तसेच कामाच्या परिसरात सुरक्षा बॅरिकेडिंग, सूचना फलक, पुरेशी प्रकाशयोजना, प्रशिक्षित सुरक्षा कर्मचारी आणि आपत्कालीन प्रतिसादासाठी आवश्यक यंत्रणा तैनात करण्यात आली होती.

तथापि, प्री-कास्ट बीम उचलण्याच्या कामादरम्यान ४०० टन क्षमतेच्या लिफ्टिंग क्रेनच्या यांत्रिकी गिअरमध्ये बिघाड झाल्याने भाराचे संतुलन बिघडले व परिणामी क्रेनचा एक भाग जमिनीपासून उचलला गेला आणि क्रेन असंतुलित झाली. सदर दुर्घटना यांत्रिक बिघाडामुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे.

अशा प्रकारच्या दुर्घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तसेच लिफ्टिंग क्रेनची वेळोवेळी देखभाल व्हावी याकरिता प्राधिकरणाकडून संबंधित कंत्राटदारावर रु. १,००,००,०००/- तसेच प्रकल्पाच्या सामान्य सल्लागारावर

रु. ५०,००,०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे. तसेच साधारण सल्लागाराच्या संबंधित अधिकाऱ्यास (Execution Expert) तात्काळ प्रकल्पातून काढण्यात आले आहे.

(३) माहे डिसेंबर २०२४ मध्ये मुंबई मेट्रो मार्ग ९ ( दहीसर ते मिरा भाईदर ) च्या मिरागाव स्थानक येथे फायर टँकसाठी पीसीसी चे काम सुरू असताना कॉंक्रीट ओतण्यासाठी ट्रान्झिट मिक्सर रिव्हर्स घेतेवेळी चालकाला उत्खनित खड्ड्याच्या कड्याचा अंदाज न आल्यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटले व ट्रान्झिट मिक्सर खड्ड्यात कोसळला. या दुदैवी अपघातात चालकाचा दुर्दैवी मृत्यू झाला.

(४) आरोग्य व पर्यावरण (Safety, Health & Environment) संदर्भातील करारातील कलम क्र. ६.० व उपकलम ६.२.२ नुसार, सदर कामात प्रत्यक्ष सहभागी असलेले जबाबदार कंत्राटदाराच्या अभियंताला साइटवरून निलंबित करण्यात आले. सदर अपघातातील गंभीर सुरक्षा त्रुटी व निष्काळजीपणाबाबत कंत्राटदारावर रुपये ३०,००,००० दंड आकरण्यात आले. तसेच, प्राधिकारणामार्फत सामान्य सल्लागाराचे जबाबदार ४ अभियंता यांना निलंबित करण्यात आले.

(५) प्राधिकरणाद्वारे प्रकल्पाच्या बांधकामादरम्यान आवश्यक सुधारात्मक (Corrective) आणि प्रतिबंधात्मक (Preventive) उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत संबंधित कंत्राटदार व सल्लागारास वेळोवेळी सुरक्षा उपाययोजनांचे काटेकपोरपणे पालन करण्यासंदर्भात सूचना देण्यात येत आहे.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागात कोट्यवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(१२) * ३६०१९ श्री.संजय देरकर (वणी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ अंतर्गत राबविण्यात आलेल्या विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याबाबत शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.सुरेश साखरवाडे हे मागील आठ वर्षांपासून एकाच विभागात कार्यरत असून त्यांच्या कार्यकाळात रस्ते व पुलांच्या दुरुस्तीसाठी मंजूर झालेल्या सुमारे ५० कोटी रुपयांच्या निधीच्या वापरात अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खुली निविदा प्रक्रिया न राबविता काही मजूर सहकारी संस्थांना नियमबाह्य पद्धतीने कामे देणे, प्रत्यक्ष काम पूर्ण न करताच कोट्यवधी रुपयांची बिले काढणे तसेच कंत्राटदारांकडून कथित कमिशन घेऊन कामांचे वाटप केल्याच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरची तालुक्यातील नाडेकल-बेटकाठी मार्गावरील खोब्रागडी नदीवरील पूल वाहतुकीस सुरू होण्यापूर्वीच निकृष्ट दर्जाचा असल्याने कोसळल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, सदर पूल दुर्घटनेनंतर चौकशी समिती नेमण्यात आली होती काय व नेमली असल्यास त्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(६) असल्यास, या सर्व तक्रारींची उच्चस्तरीय स्वतंत्र चौकशी करणे, दोषी अधिकारी व कंत्राटदारांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करणे, संबंधित अधिकाऱ्यांची तातडीने बदली करणे तसेच गडचिरोली जिल्ह्यातील सर्व प्रलंबित व पूर्ण झालेल्या विकासकामांचे विशेष लेखापरीक्षण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने सार्वजनिक निधीचा अपव्यय रोखण्यासाठी, विकासकामांमध्ये पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी व नागरिकांचा शासनावरील विश्वास अबाधित ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

श्री. सुरेश साखरवाडे सेवा जेष्ठतेनुसार कार्यकारी अभियंता या पदावर पदोन्नतीने सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १, गडचिरोली येथे दिनांक ०२.०८.२०१९ रोजी रुजू झाले. तद्नंतर सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, गडचिरोली येथे नियतकालिक बदली नुसार पदस्थापनेने दिनांक ०६.११.२०२३ रोजी रुजू झाले असून ते आजपर्यंत कार्यरत आहेत. त्यामुळे ते ८ वर्षांपासून एकाच विभागात कार्यरत आहेत असे म्हणणे संयुक्तिक नाही.

श्री. साखरवाडे त्यांचेवर केलेल्या आरोपाबाबत सार्वजनिक बांधकाम मंडळ, गडचिरोली स्तरावरुन चौकशीकरिता समिती स्थापन करण्यात आली असून, चौकशी प्रगतीत आहे.

(३) हे खरे नाही. खुली निविदा प्रक्रिया न राबविता काही मजूर सहकारी संस्थांना कामे देणे, प्रत्यक्ष काम पूर्ण न करताच देयके अदा करणे ही बाब वस्तुस्थितीस अनुसरुन नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) सावरगांव कोटगुल गोदरी बेटकाठी (गांगीन) नाडेकल ते रामा ३१४ (प्रजिमा ३) मध्ये खोब्रागडी नदीवरील कि. मी. ४७/ १०० येथील क्षतिग्रस्त झालेल्या पुलाच्या कामाची चौकशी करण्याकरिता मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून पुलाचे ठिकाण अतिसंवेदनशिल व अतिदुर्गम नक्षलग्रस्त क्षेत्रात असल्यामुळे या कामात येणाऱ्या अडचणी ह्या विभाग आणि कंत्राटदार यांच्या नियंत्रणाबाहेरच्या असल्यामुळे या दुर्घटनेबाबत कुणालाही दोषी धरता येणार नाही, असा समितीचा अहवाल आहे. त्याचप्रमाणे क्षतीग्रस्त पुलाची पुनर्बांधणी कंत्राटदार स्वत:च्या खर्चाने करुन देणार असल्याने त्या अटी-शर्तीवर शासनाने समितीचा अहवाल स्वीकृत केला आहे.

(६) प्राप्त तक्रारीची गंभीरता लक्षात घेऊन शासनाने इतर प्रादेशिक विभागातील वरील अभियंत्याची समिती नेमून त्या चौकशीअंती समितीचा अहवाल मान्य केला आहे व त्यानुसार पुन्हा इतर कोणतीही कार्यवाही करण्याचे नियोजित नाही. सखोल चौकशी, विशेष लेखापरीक्षण तसेच दोषींविरुद्ध प्रशासकीय अथवा कायदेशीर कारवाई करण्याबाबत शासन विचार करीत आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या बदलीबाबतचा निर्णय प्रचलित नियम यानुसार शासन स्तरावर घेण्यात येतो.

(७) चौकशी समितीच्या निष्कर्षांचा स्वीकार केला असला तरी शासनाने खोब्रागडी नदीवरील पुल दुर्घटनेअनुषंगाने गडचिरोली सारख्या दुर्गम - नक्षलप्रभावित क्षेत्रातील कामासाठी तज्ज्ञ व IIT तत्सम दर्जेदार संस्था-व्यक्ती यांची मदत व त्यांच्याकडून मार्गदर्शन घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

-----------------

## जिवती (जि.चंद्रपूर) तहसील कार्यालयात मयत लाभार्थ्यांच्या नावाने बनावट देयके काढल्याबाबत

**(१३) * ३२९५५ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तहसील कार्यालयातील तहसीलदार व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने सन २०१७ ते २०२५ पर्यंत संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेमध्ये मयत लाभार्थ्यांच्या नावाने बनावट देयके काढून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक घोटाळा केला असल्याचे दिनांक १ मे, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घोटाळयातील १० लाख ४६ हजार रुपयांची रक्कम तहसील कार्यालयातील वरिष्ठ लिपिक यांच्या मुलीच्या बँक खात्यात १० लाख ४६ हजार रुपये सन २०२२ मध्ये जमा झाली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) जिवती (जिल्हा-चंद्रपूर) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेमधील मयत लाभार्थ्यांच्या खात्यात जमा असलेल्या रक्कमेबाबत अपहार झाल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी उपविभागीय अधिकारी, राजूरा यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी पथक नेमले होते. सदर पथकाच्या चौकशी अहवालानुसार, जिवती तहसिल येथील आहरण व संवितरण अधिकारी यांचे बँक खात्यामधून भारतीय स्टेट बँकेच्या अशासकीय खात्यात एकूण रु.३४,०१,५००/- इतकी रक्कम वळती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले. तद्नंतर, सदर प्रकरणी तत्कालिन महसूल अधिकारी यांनी दि.२३/०१/२०२५ रोजी रु.३४,०१,५००/- इतक्या रक्कमेचा डी.डी. (डिमांड ड्राफ्ट) तहसिलदार, जिवती यांच्याकडे जमा केलेला आहे.

तसेच सदर प्रशासकीय व वित्तीय अनियमिततेस जबाबदार असलेल्या सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत चौकशी पथकाने शिफारस केली आहे. त्यानुषंगाने सदर प्रकरणात आर्थिक गैरव्यवहारात सामील सर्व दोषीवर फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. तसेच दोषी अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर प्रशासकीय कार्यवाहीचे प्रस्ताव आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयामार्फत महसूल व वन विभागास सादर करण्यात आले आहेत.

-----------------

## उरण येथील जेएनपीए बंदर मार्गावरील उड्डाणपुलाच्या निकृष्ट कामाबाबत

**(१४) * ३४२५३ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण येथील जेएनपीएच्या चौथ्या बंदराशी जोडणारा सुमारे ७०० मीटर लांबीचा उड्डाणपूल अवघ्या ८ ते १० महिन्यांत खचल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उड्डाणपुलाचे काम NHAI (National Highways Authority of India) कडे सोपवण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ६८ कोटी रुपये खर्चूनही पुलाचे बांधकाम इतक्या कमी कालावधीत खचल्याने पुलाच्या निकृष्ट दर्जासाठी जबाबदार असणाऱ्या कंत्राटदार आणि संबंधित देखरेख करणाऱ्या अभियंत्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने या संपूर्ण मार्गावरील इतर पुलांच्या बांधकामांचे ‘स्ट्रक्चरल ऑडिट’ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) व (२) भारत मुंबई कंटेनर टर्मिनल या चौथ्या बंदराशी जोडणाऱ्या उड्डाणपूलाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. सदर उड्डाणपूलाचे काम मार्च, २०२२ मध्ये पूर्ण करण्यात आले असून प्रकल्पाचा दोष दायित्व कालावधी डिसेंबर, २०२५ अखेर पूर्ण झाला आहे.

जासखार पूलाची मुख्य संरचना सुस्थितीत असून उड्डाणपूलाच्या अप्रोच स्लॅब भागामध्ये काही भाग खचल्याचे (settlement) आढळून आले आहे.

पूलाच्या settlement ची बाब निदर्शनास आल्यानंतर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत संबंधीत कंत्राटदारांस तात्काळ त्रुटी दुरुस्तीबाबत नोटीस बजावण्यात आली आहे. सद्यस्थितीत वाहतूक विभागाकडून रस्ता बंद करण्याची आवश्यक परवानगी प्राप्त करून संबंधीत कंत्राटदारांमार्फत दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.

(३) व (४) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अहवालानुसार पूलाच्या बांधकामावेळी वेळोवेळी गुणनियंत्रण चाचण्या घेण्यात आल्या होत्या. तसेच इतर पूलांचे स्ट्रक्चरल ऑडीट एप्रिल, २०२६ मध्ये करण्यात आले असून त्यामध्ये settlement (खचल्याचे) आढळून आलेले नाही.

(५) वाहतूक पोलिस विभागाकडून वाहतूक बंद / वळविण्याबाबत आवश्यक परवानगी प्राप्त होण्यास झालेल्या विलंबामुळे दुरुस्तीच्या कामांच्या अंमलबजावणीस विलंब झाला.

-----------------

## नांदेड जिल्ह्यात डांबर पुरवठ्यात झालेल्या गैरव्यवहाराची उच्चस्तरीय (SIT) चौकशी करण्याबाबत

**(१५) * ३८००८ श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात सन २०१८-१९ मध्ये मोठ्या प्रमाणात डांबरामध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असून या गैरव्यवहारामध्ये सहभागी असलेले अनेक कंत्राटदार खुलेआम शासकीय कंत्राट घेत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची सद्यस्थिती काय आहे व चौकशी अहवाल शासनाकडे सादर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अहवालाच्या अनुषंगाने उच्चस्तरीय (SIT) चौकशी करून सदर गैरव्यवहारात सहभागी असलेल्या कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशत: खरे आहे,

महालेखाकारांनी सन २००७ मध्ये लेखापरीक्षणावेळी कंत्राटदारांनी कामांच्या देयकासोबत सादर केलेले चलन व शासकिय रिफायनरी यांनी सादर केलेले डांबर पुरवठ्याची कागदपत्रे हे जुळत नसल्याने महालेखाकारांनी सन २०१२-१३ च्या लेखापरीक्षण अहवालात याबाबत आक्षेप उपस्थित केले आहेत.

अशा एकूण ६ कंत्राटदारांपैकी १ कंत्राटदाराचे अभिलेख जुळले असल्याने उर्वरित ०५ कंत्राटदारांविरुध्दची प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्याने विभागामार्फत कंत्राटदारांवर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(२) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या २०१२-१३ च्या आर्थिक क्षेत्र अहवालात अशा प्रकारे डांबर चलनांच्या कागदपत्रातील तफावत याचा उल्लेख आहे व त्यानुसार मा. लोकलेखा समितीद्वारे या प्रकरणी शासनास सुचना केल्या आहेत.

(३) संबंधित ५ कंत्राटदारांविरुध्दचे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात बनावट इंजेक्शन व औषधांची विक्री होत असल्याबाबत**

**(१६) * ३३७८७ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील दीड ते दोन वर्षात कोटयवधी रुपयांची बनावट इंजेक्शने, औषधे व अन्य वैद्यकीय उत्पादने यांची विक्री होत असल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर येथील तुलसीनगरातील हितांशी फार्मास्युटिकल्स येथे बनावट औषधांचा साठा सापडला असून सदर साठा चंदीगड येथील ग्लास्को फार्मास्युटिकल्स येथे तयार करण्यात येत होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील आर.आर.टी फार्माचा मालक श्री. रितेश ठोंबरे हा या गोरखधंद्याचा राज्यातील महत्वाचा दुवा असून त्याने पुणे व आजुबाजूच्या परिसरात देखील विक्रीचे जाळे पसरविल्याने त्याच्याविरोधात गुन्हाही दाखल झाला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रिलायन्स लाईफ केअरच्या नावाखाली ॲलब्युरेलचा बनावट साठा बाहेरील राज्यातील डिस्ट्रीब्युटर्सच्या माध्यमातून मुंबई, रायगड, पुणे, नागपूर येथील हितांशी फार्मास्यूटीकल्स, श्रीराम हेल्थ केअर, आर एस एल डिस्ट्रीब्युटर्स, श्रीशैलम राजय्या व प्रिझेम ट्रेडर्स यांच्यासोबत संगनमत करुन बनावट ॲलब्युरेलची विक्री करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर बनावट इंजेक्शनचा साठा मुंबई, दिल्ली, हैदराबाद व नवी मुंबईमार्गे नागपूरसह महाराष्ट्रातील विविध भागात पोहचविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, राज्यातील रुग्णांच्या जीविताशी खेळ करणाऱ्या बनावट औषधांच्या उत्पादन व वितरणामागील संपूर्ण साखळी उघड करण्यासाठी विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्यात आली असून त्यांनी शासनाकडे याबाबतचा अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनावट औषधांचा काळाबाजार करणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाईसह बनावट औषधांच्या निर्मिती व विक्रीस आळा घालण्यासाठी औषध साठ्यांची तपासणी, पुरवठा साखळीचे परीक्षण व विशेष मोहीम राबविण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१), (२), (३), (४), (५) हे खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाने मे. मैत्री फार्मास्युटिकल्स, पुणे या होलसेल औषध आस्थापनाची दि.२८/०७/२०२५ व दि.०१/०८/२०२५ रोजी तपासणी केली. सदर तपासणीवेळी घेण्यात आलेला Albural २० mg Injection B.No.AN२०७२५०६९, MFG BY. M/s Reliance Life Science Pvt. Ltd या औषधाचा नमुना अहवाल क्र.NSO /MUM/१५००२६/२०२६, दि.०२/०२/२०२६ रोजी प्राप्त झाला असून सदर औषध बनावट घोषित झाले आहे.

सदर प्रकरणी चौकशी केली असता, मे. मैत्री फार्मास्युटिकल्स, सदाशिव पेठ, पुणे यांनी सदर औषध मे. श्री. साई लॉजीस्टीका खडगाव रोड, वाडी, नागपूर येथून खरेदी केले होते. तसेच, मे.श्री. साई लॉजीस्टीका खडगाव रोड, वाडी, नागपूर यांनी सदर साठा M/s. Nexus Lifecare Pvt Ltd, Mumbai व M/s. NRX Distributors LLP, चुनाभटटी, सायन, मुंबई यांचेकडून खरेदी केला होता.

तसेच, संशयावरुन मे. श्रीराम हेल्थकेअर, पुणे येथून देखील Alburel (Human Normal Albumin IP) १००ml, B.No. AN२०७२५०७७ उत्पादक मे. रिलाईन्स लाईफ सायन्सेस नाशिक प्रा. लि. नाशिक या औषधांचे नमुने घेतले. मे. श्रीराम हेल्थकेअर यांनी या औषधाची खरेदी मे. आर. एस. एल. फार्मा, सदाशिव पेठ, पुणे येथून केली होती. म आर. एस. एल. फार्मा, सदाशिव पेठ, पुणे येथे सदर औषधाचा B.No. AN२०७२५०८४ चा एकूण ३९ बॉटल्स चा साठा आढळला असून दि.१२/११/२०२५ रोजी सदर बनावट औषधांचा रु.४,१९,२४५/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला. सदर औषधाची खरेदी मे.श्रीराम हेल्थकेअर, पुणे यांनी मे. NRX Distributors LLP, सायन, मुंबई व मे. RRT फार्मा, कामोठे, नवी मुंबई यांचे कडून केल्याचे उघड झाले.

या प्रकरणी M/s. Nexus Lifecare Pvt Ltd, Naigaon Cross RD, Dadar (E), Mumbai या पेढीची दि. ०२.०२.२०२६ रोजी व M/s. NRX Distributors LLP, चुनाभटटी सायन, मुंबई या पेढीची दि. ०४.०२.२०२६ रोजी तपासणी करण्यात आली. सदर दोन्ही पेढयांनी बनावट औषधांचा साठा M/s RRT Pharma, Kamothe, Dist- Raigad यांच्याकडून खरेदी केली असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार, दिनांक १३/०९/२०२५ व दिनांक १५/०९/२०२५ रोजी अन्न व औषध प्रशासनाने M/s RRT Pharma, Kamothe, नवी मुंबई येथे तपासणी केली. तेव्हा सदर पेढी मालक श्री.रितेश ठोंबरे यांनी सदर औषधांचा खरेदी-विक्री तपशील उपलब्ध केला नाही. चौकशीअंती त्यांनी सदर औषधे दानिश खान राहणार दिल्ली यांचेकडून विना खरेदी बिलाने खरेदी केले असल्याचे सांगितले. तसेच, दानिश खान यांनी सदर औषधे श्री. राजकुमार मिश्रा राहणार चंदिगड, पंजाब यांच्याकडून कॅश स्वरुपात विना बिल खरेदी केले असल्याचे सांगितले. श्री.राजकुमार मिश्रा यांच्या चंदीगड येथे Glasso Pharmaceutical, आणि Unital Pharmaceutical, Manimajara, अशा जेनेरिक औषध बनावणाऱ्या कंपन्या आहेत. सदर प्रकरणी पुणे पोलीसांनी संबंधित आरोपीं विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ (४), ३३६ (३), ३४०(२), २७८, ६०, व ३(५) च्या अंतर्गत प्रथम खबर अहवाल क्रमांक ०१८२/२०२५, दि.१६/०९/२०२५ व प्रथम खबर अहवाल क्र.००३५/२०२६, दि.२७.०२.२०२६ नोंदविला आहे. संबंधित आरोपींना कामोठे येथून चौकशी करिता ताब्यात घेतले असून त्यांना मा.न्यायालयाने पाच दिवसाची कोठडी सुनावलेली होती.

नागपूर येथे अन्न व औषध प्रशासनाने दिनांक १८/०९/२०२५ रोजी मे. हितांशी फार्मास्युटीकल्स, नागपुर या पेढीच्या तपासणीवेळी पेढीमधून "Alburel (Alburel Injection २०%)" B.No.AN२०७२५०७७, Mfg Dt- JUN २०२५, उत्पादक Reliance Life Science Nashik Pvt. Ltd. Nashik या औषधाचा नमुना घेतला. सदर नमुन्याचा अहवाल दि.१५.१०.२०२५ रोजी प्राप्त झाला असून तो शासकीय विश्लेषक, मुंबई यांनी बनावट असल्याचे घोषित केले. मे. हितांशी फार्मास्युटीकल्स, नागपुर यांनी सदरचा बनावट औषधसाठा M/s. NRNxt Distributors LLP, Sion, Mumbai यांचेकडून खरेदी केला असल्याचे कळविले आहे. M/s. NRNxt Distributors LLP, Sion, Mumbai यांनी सदर औषधाची खरेदी M/s. NR Distributors, Hyderabad, TELANGANA यांचेकडून केली आहे. M/s. NR Distributors, Hyderabad, TELANGANA यांनी सदरचा बनावट घोषित औषध साठा M/s. RRT Pharma, Kamothe, Navi Mumbai यांचेकडून खरेदी केला असल्याचे निष्पन्न झाले. M/s. RRT Pharma, Kamothe, Navi Mumbai या पेढीने वर नमुद औषधाची खरेदी विना बिलाने दानिश खान, दिल्ली यांचेकडून केली. दानीश खान याने सदर बनावट औषधी राजू कुमार मिश्रा, चंदीगढ यांचेकडून घेतली होती.

सदर प्रकरणी बनावट औषधाचे उत्पादन कोणी केले व कोठे केले याचा सखेल तपास होण्यासाठी संबंधित पेढ्यांविरुध्द व व्यक्तींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ मधील कलम ३१८(४), ३३६(३), ३४०(२), २७८, ६०, ३(५) अंतर्गत शांती नगर पोलिस स्टेशन, नागपुर येथे प्रथम खबर अहवाल क्रमांक ८९/२०२६ दि.२३.०४.२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

M/s Reliance Life Science Pvt. Ltd, नाशिक यांनी दि.०९.०१.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सदर औषधाचे उत्पादन केले नसल्याचे स्पष्ट केले आहे.

(६) व (७) सदर बनावट औषध विक्री प्रकरणाचा सखोल तपास करण्यात आला असून, तपासादरम्यान बनावट औषधांच्या विक्री व वितरणामध्ये सहभागी असल्याचे आढळून आलेल्या इतर २५ औषध विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. तसेच, या प्रकरणी सर्व संबंधितांविरूद्ध पुणे व नागपूर येथे तीन गुन्हे दाखल करण्यात आले असून मा. पुणे सत्र न्यायालय येथे खटला क्र. ४३५४/२०२६ दि.२६/०५/२०२६ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

राज्यातही अन्न व औषध प्रशासनामार्फत वरीलप्रमाणे औषध विक्री साखळीवर नियमित देखरेख ठेवून बनावट जीवनरक्षक औषधांचे साठवणूक, वितरण व विक्री यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष तपास मोहीमा, नमुना संकलन, छापे, जप्ती व खटले दाखल करण्याची कार्यवाही सातत्याने करण्यात येते.

तसेच, (GSR ८२३ (E), दि.१७/११/२०२२ नुसार नियमातील अनुसुची H२ मधील औषधांच्या पाठांना प्रायमरी पॅकेजींगवर औषधांच्या असलेबाबत पडताळणी करणेस्तव औषधांच्या पाठांच्या लेबलवर QR Code नमुद करणे औषधे व सौंदर्य प्रसाधने नियम, १९४५ मधील नियम ९६ (६) नुसार अनिवार्य आहे.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू नोंदणी विभागामार्फत बनावट जन्म दाखले देण्यात येत असल्याबाबत

**(१७) * ३२४६७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू नोंदणी विभागात सन २०२४ ते २०२५ या कालावधीत जन्म-मृत्यू नोंदणी प्रक्रियेमध्ये सुमारे ८७ हजार नोंदींबाबत अनियमितता झाल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनधिकृतपणे फेरफार करून शहरात बेकायदेशीररीत्या राहणाऱ्या स्थलांतरितांना बनावट जन्म दाखले देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किती जन्म नोंदींमध्ये दुरुस्ती करण्यात आली असून त्यापैकी किती प्रकरणे संशयास्पद आढळली आहेत व सदर प्रकरणामध्ये बनावट नोंदी, चुकीचे वर्गीकरण व नोंद प्रक्रियेमधील त्रुटींबाबत चौकशी करण्यात आली आहे,

(४) असल्यास, बनावट जन्म प्रमाणपत्रांच्या आधारे इतर शासकीय कागदपत्रे (आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट इ.) मिळविण्यात आली असून जन्म-मृत्यू नोंदणी प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुरक्षित करण्यासाठी सीआरएस प्रणालीशी संलग्न तांत्रिक सुधारणा, पडताळणी यंत्रणा व नियंत्रण प्रणाली लागू करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बृहन्मुंबई महापालिकेने जन्म – मृत्यूचा दाखला देण्याचे बंद केले असून सदर जन्म – मृत्यू दाखला २१ दिवसांत न मिळाल्यास सदर दाखला मॅजेस्ट्रिककडून आणावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्यासाठी तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जन्म आणि मृत्यू नोंदणी विभागाने संबंधित नागरिकांकडून प्राप्त झालेल्या अर्जानुसार, सन २०२४ ते मार्च, २०२६ या कालावधीत SAP प्रणालीमध्ये सन २०१६ पूर्वीच्या ८६०२२ जन्म नोंदी मधील दुरुस्ती केल्या आहेत.
(२) व (३) जन्मनोंदीमधील दुरुस्तीसंदर्भात केंद्र शासनाच्या दिनांक २७ जुलै, २०१५ रोजीच्या मार्गदर्शक सूचनामध्ये स्पष्टता नव्हती. त्यामुळे सन २०१६ पूर्वी करण्यात आलेल्या SAP प्रणालीमधील नोंदणीमधील दुरुस्ती नागरिकांच्या मागणीनुसार तपासणी करुन त्याच प्रणालीत करण्यात आल्या. SAP प्रणालीमधील ८६०२२ जन्मनोंदी दुरुस्तीपैकी १९७३४ नोंदी अपुऱ्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात आल्याचे आढळून आले.

आता शासनाने दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी पुन्हा मार्गदर्शन सूचना निर्गमित केल्या. त्यामध्ये सन २०१६ पूर्वी करण्यात आलेल्या जुन्या प्रणालीतील नोंदी सिव्हील रजिस्ट्रेशन सिस्टीम (CRS) प्रणालीमध्ये “Add old events” या Tab चा वापर करून घेण्यात यावे, असे नमूद केले. सदर नोंदी नागरिकांच्या अर्जानुसार व कागदपत्रे तपासून CRS प्रणालीमध्ये करण्यात आल्या.

आता संचालक (प्राथमिक), आरोग्य सेवा, पुणे तथा मुख्य निबंधक, जन्म व मृत्यू, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १८ जून, २०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये, जन्मनोंदी दुरुस्ती संदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

जन्मनोंदी प्रमाणपत्र खोट्या दस्तऐवजाच्या आधारे देण्यासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अधिकार क्षेत्रात गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडून तपास करण्यात येत होता. तथापि, या विषयाची व्याप्ती मोठी असल्यामुळे प्रभावी व सखोल तपासणी करण्यासाठी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आदेशान्वये, पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ५ मे, २०२६ रोजी विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्यात आले आहे.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने SAP प्रणालीवर घेतलेल्या जन्मनोंदी दुरुस्ती ह्या CRS Portal वर स्थलांतरीत करण्याकरीता संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचेकडे API Interface उपलब्ध करुन देण्याची दिनांक १ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली असून सदर ॲक्सेस उपलब्ध झाल्यानंतर अशा नोंदी स्थलांतर करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.
(५) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही नागरिकांना जन्म-मृत्यू दाखला देण्याचे बंद केलेले नाही.

केंद्र शासनाच्या जन्म आणि मृत्यू नोंदणी कायदा, १९६९ च्या कलम-१३(३) मधील तरतूदीनुसार कोणत्याही जन्म-मृत्यूची नोंदणी १ वर्षाच्या आत केली नसल्यास अशा नोंदणीसाठी प्रथमवर्ग दंडाधिकारी अथवा जिल्हा दंडाधिकारी यांनी पडताळणी करुन प्रमाणित केल्यानंतर त्याची नोंद निश्चित केलेले शुल्क आकारुन करण्यात येते.
(६) या प्रकरणामध्ये संबंधित जबाबदार १ उप निबंधकांना दिनांक ४ मे २०२६ रोजी निलंबित केले आहे. तसेच संबंधित सर्व वैद्यकीय अधिकारी यांची खात्याअंतर्गत चौकशी प्रस्तावित आहे.

-----------------

**मुंबई महानगर विकास प्राधिकरण यांनी दोषी सल्लागार कंपनीला**
**पुन्हा 'मेट्रो ४' मार्गिकेवर सल्लागार म्हणून नियुक्त केल्याबाबत**

**(१८) * ३२४२७ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील वडाळा ते ठाणे कासारवडवली मेट्रो ४ मार्गिकेच्या कामादरम्यान मुलुंड येथे झालेल्या अपघातात एक जणाचा मृत्यू व तीन जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडल्यानंतर संबंधित ठेकेदार व सल्लागार कंपनी डीबी एचआयएलएल -एलबीजीबरोबरचा करार रद्द करून त्यांच्या विरोधात कारवाई करून काळ्या यादीत टाकण्यात आल्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून जाहीर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या जागी नवीन सल्लागाराची नियुक्ती करण्यात येणार असल्याचेही अपघातानंतर जाहीर करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगर विकास प्राधिकरण यांनी दोषी सल्लागार कंपनीला पुन्हा 'मेट्रो ४' मार्गिकेवर सल्लागार म्हणून कायम ठेवण्यात आल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालात कंत्राटदार कंपनी (Reliance-Astaldi JV) आणि सल्लागार कंपनीवर देखरेखीतील त्रुटींबाबत आरोप करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी सल्लागार कंपनीला कायम ठेवण्याच्या निर्णयाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) मेट्रो मार्ग-४ प्रकल्पांतर्गत मुलुंड अग्निशमन केंद्राजवळ मेट्रो व्हायाडक्टवर दि. १३.०२.२०२६ रोजी रात्री पॅरापेट/कठडे उभारण्यात आले होते. प्रचलित पद्धतीनुसार, हे पॅरापेट/कठडे प्रिकास्ट असल्याने, सुरुवातीस तात्पुरत्या आधाराने ठेवले जातात. तेथील काँक्रीटचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर प्रिकास्ट पॅरापेट/कठडे कायमस्वरूपी स्थित होतात. सदर ठिकाणी काही पॅरापेट/कठडे तात्पुरत्या आधारावर स्थित होते. परंतु, दिनांक १४.०२.२०२६ रोजी कामगाराकडून अनावधानाने एका पॅरापेट कठड्याचा तात्पुरता आधार कापला गेल्याने तो पॅरापेट कठडा खालील रस्त्यावर जाणाऱ्या वाहनावर कोसळला. या दुर्घटनेत एका व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यु झाला असून तीन जण जखमी झाले. सदर प्रकल्पाचे काम सुमारे ९०% पूर्ण झाले असल्याने कामातील सातत्य राखण्यासाठी उर्वरित कामांसाठी नवीन प्रकल्प सल्लागार नेमणे किंवा दुस-या सल्लागारामार्फत (मेट्रो मार्ग-२ब चे प्रकल्प सल्लागार-AICA) करण्याबाबत चाचपणी करण्यात आली. परंतू काम ९० टक्के पुर्ण झाले असल्याने उर्वरित कामांसाठी नवीन प्रकल्प सल्लागार नेमणे योग्य ठरले नसते. यास्तव सदर प्रकल्पावर कार्यरत असणा-या सल्लागार कंपनी (मे. डी. बी. इंजिनियरिंग ॲण्ड कन्सल्टिंयग जी.एम.बी.एच., हिल इंटरनॅशनल आय.एन.सी. ॲण्ड लुईस बर्जर कन्सल्टिं ग प्रा. लि.) करार रद्द केला नसून सुरुवातीपासून कार्यरत असणाऱ्या सल्लागार कंपनीस मुदतवाढ देऊन काम सुरु ठेवण्यात आले आहे. सदर दुर्घटनेसाठी कंत्राटदारास रु.५.०० कोटी व साधारण सल्लागारास रु.१.०० कोटी इतका दंड लावण्यात आला आहे.

सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने संपूर्ण मेट्रो मार्ग - ४ ची सुरक्षा तपासणी करण्याकरीता प्राधिकरणाने समिती स्थापित केली होती. सदर समितीचा तपासणी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात घडलेली घटना ही संरचनात्मक आराखडा किंवा बांधकामाच्या एकूण गुणवत्तेतील कोणत्याही त्रुटींमुळे घडलेली नसून कामगाराच्या अनावधानाने झालेल्या मानवी चुकीमुळे आणि साधारण सल्लागाराकडून कामाच्या ठिकाणची अपुरी देखरेख यामुळे घडली आहे. तसेच अहवालात नमूद केल्याप्रमाणे सुरक्षा उपाययोजना प्रकल्पस्थळी राबविण्यात येत आहेत. सद्यस्थितीत सदर बाब मा. न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन आहे.

-----------------

## मराठवाड्यातील विकासकामांचा निधी प्रलंबित असल्याबाबत

**(१९) * ३६५४२ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लहान-मोठ्या कंत्राटदारांनी केलेल्या विकासकामांची अब्जावधी रुपयांची थकबाकी प्रलंबित असून, त्यापैकी केवळ मराठवाड्याची सुमारे ४ हजार कोटी रुपयांची थकबाकी अद्याप मिळालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्रातील शासकीय कंत्राटदारांनी राज्य शासनाकडे सुमारे ९६ हजार कोटींची प्रलंबित देयके असल्याच्या व थकीत निधी मिळत नसल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र कंत्राटदार महासंघाच्या नेतृत्वाखाली कंत्राटदारांनी दिनांक ७ एप्रिल, २०२६ पासून 'बेमुदत काम बंद' आंदोलन करुनही कोणतीही रक्कम मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याची तब्बल १,१०० कोटी रुपयांची थकबाकी असताना, मागील आर्थिक वर्षात शासनाने फक्त ५० कोटी रुपये दिल्याने ज्यामुळे जिल्ह्यातील रस्त्यांची व इमारतींची कामे अर्धवट अवस्थेत आहेत, हे ही खरे काय,

(४) असल्यास, शासनाने गेल्या १७ महिन्यांत सादर केलेल्या दोन बजेटमध्ये कंत्राटदारांच्या कोट्यवधी रुपयांच्या जुन्या देयकांचा निपटारा करण्यासाठी कोणतीही आर्थिक तरतूद केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील ३ लाख कंत्राटदारांकडे काम करणाऱ्या लाखो अभियंते, तंत्रज्ञ आणि बांधकाम मजुरांचे उपजीविकेचे साधन हिरावले गेले असून या मजुरांची बिकट परिस्थिती पाहता, शासन थकीत देयकांसाठी विशेष पॅकेज किंवा पुरवणी मागण्या मंजूर करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास,कंत्राटदार संघटना २९ हजार कोटी तर शासन १८ हजार कोटी रुपयांची थकबाकी सांगत असून आकडेवारीतील विसंगती दूर करण्यासाठी आणि देयकांचे लेखापरिक्षण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली आहे काय,

(७) असल्यास, बांधकाम विभागाकडील अंतर्गत चौकशा, टेंडरमधील अनागोंदी आणि डीपीसीच्या (DPC) कामांमधील गैरप्रकार यांमुळे विभागाची मलीन प्रतिमा सुधारण्यासाठी आणि नवीन कामांना मंजुरी देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने प्रलंबित ४ हजार कोटींपैकी किमान ५० टक्के रक्कम चालू अधिवेशनातच मराठवाड्यासाठी तातडीने वर्ग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) व (२) राज्यमार्ग (रस्ते व पूल) व प्रजिमा (रस्ते व पूल) योजनेअंतर्गत मे-२०२६ अखेर विभागांतर्गत एकूण रु.२०८५७ कोटीची देयके प्रलंबित होती. त्यापैकी, मराठवाडा प्रदेशांतर्गत एकूण रु.४६७३ कोटीची देयके प्रलंबित होती. चालू आर्थिक वर्षात सदर देयकांच्या अनुषंगाने रु.३२९६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून, त्यापैकी मराठवाडा प्रदेशांतर्गत एकूण रु.७१० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी माहे एप्रिल, २०२५ अखेर "राज्यमार्ग व प्रजिमा" योजनेंतर्गत रु.९८६.८७ कोटी प्रलंबित देयकासाठी मागील आर्थिक वर्षात रु.४९३.७७ कोटी इतका निधी खर्च झाला आहे.

(४), (५), (६), (७) व (८) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग (रस्ते व पूल) योजनेंतर्गत मूळ तरतूद रु.११७०३ कोटी इतकी होती. प्रलंबित देयके विचारात घेऊन, पुरवणी मागणीद्वारे

रु.२८०४.०० कोटी इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात आली. मागील वर्षाच्या तुलनेत मूळ तरतुदीत ६२ टक्के वाढ करून चालू वर्षाकरिता रु.१८९५० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात प्रलंबित देयकांच्या अनुषंगाने रु.३२९६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून, त्याव्यतिरिक्त TReDS (Trade Receivables Discounting System) प्लॅटफॉर्मद्वारे रु.३२९६ कोटींच्या देयकांची अदायगी करण्याचे नियोजित आहे. तसेच, केंद्र शासनाच्या विशेष सहाय्य योजनेतील निधी व विहित मार्गाने आवश्यक ती तरतूद अर्थसंकल्पीत करून प्रलंबित देयके टप्प्याटप्प्याने अदा करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## नागपूरच्या बेसा-पिंपळा नगरपंचायतीचे विद्यमान मुख्याधिकारी यांनी बेहिशोबी मालमत्ता जमा केल्याबाबत

**(२०) * ३२४९० श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरच्या बेसा-पिंपळा नगरपंचायतीचे विद्यमान मुख्याधिकारी यांनी नगरपंचायत क्षेत्रात सुरू असलेल्या विकासकामांवर अवैध वसुली सुरु केली असून त्यामाध्यमातून कोट्यवधी रुपयांची बेहिशोबी मालमत्ता जमा केली असल्याचे दिनांक १२ मे, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपंचायत क्षेत्रातील विकास कामांवर सुरू असलेल्या अवैध वसुलीचा विपरीत परिणाम कामांच्या दर्जावर होवून निकृष्ट दर्जाची विकासकामे केली जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बेहिशोबी मालमत्ता जमा करणाऱ्या मुख्याधिकारी यांचेविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) या आशयाची तक्रार त्रयस्थ पक्षाकडून/व्यक्तीकडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झाली आहे.

(३) व (४) जिल्हाधिकारी कार्यालयाने कार्यकारी अभियंता, नगरपालिका प्रशासन, जि.नागपूर यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत दि.१८ मार्च, २०२६ रोजीच्या पत्रान्वये आदेशित केले आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जार व बाटलीबंद पाण्यामध्ये इथिलिन ग्लायकॉल सारख्या घातक रसायनांचा वापर होत असल्याबाबत

**(२१) * ३३५३१ श्री.राजेश बकाने (देवळी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध शहरांमध्ये विक्रीस उपलब्ध असलेल्या जार व बाटलीबंद पाण्याच्या गुणवत्तेबाबत वारंवार तक्रारी प्राप्त होत असून काही ठिकाणी पाणी त्वरित थंड करण्यासाठी 'इथिलिन ग्लायकॉल'(Ethylene Glycol) या घातक रासायनिक द्रवाचा वापर केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लग्नसमारंभ, सामाजिक कार्यक्रम व विविध सार्वजनिक सोहळ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या २० लिटर जारमधील पाणी कृत्रिमरीत्या थंड करण्यासाठी काही पाणीपुरवठादारांकडून थेट रासायनिक द्रव्य मिसळण्याचे प्रकार होत असल्याबाबत शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारे 'इथिलिन ग्लायकॉल'(Ethylene Glycol) मिश्रित पाण्याच्या सेवनामुळे नागरिकांना उलटी, मळमळ, मूत्रपिंड निकामी होणे, हृदयविकार तसेच इतर गंभीर आरोग्यविषयक दुष्परिणाम होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील जार पाणी उत्पादक प्रकल्प, पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर युनिट्स तसेच थंड पाणी पुरवठा करणाऱ्या केंद्रांची तपासणी करण्यासाठी महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडून गेल्या तीन वर्षांत किती तपासण्या करण्यात आल्या व त्यामध्ये किती नमुने निकृष्ट अथवा अपात्र आढळले आहेत,
(५) तसेच, सध्या सीलबंद पाण्यावरच कारवाई करण्याचा अधिकार संबंधित विभागास असल्याने उघड्या जार पाण्याच्या गुणवत्तेवर प्रभावी नियंत्रणासाठी स्वतंत्र नियमावली अथवा कारवाईची यंत्रणा उपलब्ध नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यातील सर्व जार पाणी प्रकल्पांची विशेष तपासणी मोहीम राबविणे, नियमित नमुना परीक्षण सक्तीचे करून संबधित दोषींवर कारवाई करण्यासह जार व बाटलीबंद पाण्याच्या गुणवत्तेवर कठोर नियंत्रण ठेवण्यासाठी, ग्राहकांसाठी तक्रार नोंदणीची सुलभ व्यवस्था उपलब्ध करून देणे व पाणी गुणवत्तेबाबत जनजागृती मोहीम राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) अन्न व औषध प्रशासनाद्वारे राज्यात १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२६ या ३ वर्षाच्या कालावधीत पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर या अन्न पदार्थ आस्थापनांच्या १८२ तपासण्या करण्यात आल्या त्यामध्ये एकूण १७७ नमुने विश्लेषणसाठी घेण्यात आले. त्यापैकी ११५ नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्रमाणित घोषित झाले आहेत. १३ अन्न नमूने कमी दर्जाचे, ४ नमुन्यांचे अहवाल मिथ्याछाप घोषित झाले व २० नमुने असुरक्षित घोषित झाले आहेत. तसेच २५ अन्न नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत.
(५) होय, हे खरे आहे.

उघड्या जार मधील पाणी हे अन्न सुरक्षा व मानके कायदयातील कलम ३ (१) (१) नुसार अन्न पदार्थाच्या व्याख्येत / संज्ञेत येत नसल्याने खुल्या स्वरुपातील अथवा जारमध्ये विक्री होत असलेल्या पिण्याच्या पाण्याचे नमुने अन्न व औषध प्रशासनाकडून घेण्यात येत नाहीत. अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व त्या अंतर्गत नियम व नियमने, २०११ नुसार (पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर) पाण्यासाठी अन्न सुरक्षा व मानके (फूड प्रॉडक्टस ॲन्ड फूड ॲडिटिव्ह) नियमन,२०११ मधील नियमन २.१०.८ अन्वये मानके निश्चित करण्यात आलेली आहेत. त्याअनुषंगाने प्रशासनाकडून पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरचे अन्न नमुने विश्लेषणासाठी नियमितपणे घेतले जातात.तसेच मा.मंत्री, अन्न व औषध प्रशासन यांच्या अध्यक्षतेखाली नगरविकास विभाग व नागपुर मनपाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दि.१७.०२.२०२६ रोजी आयोजीत बैठकीत जार व इतर अनुषंगीक माध्यमातून पिण्याचे पाणी पुरवठयाबाबत एसओपी तयार करण्याचे निर्देश आयुक्त, नागपुर महानगरपालिका यांना दिले आहे.
(६) बाटलीबंद पाण्याच्या गुणवत्तेवर कठोर नियंत्रण ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने तपासणी मोहिम राबविण्याच्या दृष्टीकोनातुन ग्राहकांच्या सर्व तक्रारीसाठी टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ जारी केला असून तक्रारीसाठी प्रशासनाच्या संकेतस्थळावर राज्यातील सर्व कार्यालयाचे पत्ते प्रसिद्ध केलेले आहेत,

जनजागृतीसाठी प्रसारमाध्यमे, सामाजिक माध्यमे व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून मोहीमा राबविण्यात येत आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## ओशिवरा (ता.अंधेरी) येथील लोखंडवाला कॉम्प्लेक्स परिसरातील गृहबांधणी प्रकल्पात झालेली अनियमितता

**(२२) * ३२७४७ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओशिवरा (ता.अंधेरी) येथील सर्व्हे क्र. ४१ मधील क्षेत्रास गृहबांधणी प्रयोजनार्थ नागरी जमीन कमाल धारणा कायदा, १९७६ च्या कलम २० अन्वये सूट देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्षेत्रातील विकासकाम करताना विकासक ओशिवरा लॅन्ड डेव्हलपमेंट कंपनी प्रा.लि. (Oshiwara Land Development Company Pvt. Ltd.) यांनी मंजूर अटी व शर्तींचे उल्लंघन करून अनियमितता केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनियमिततांबाबत जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे शासनाची आर्थिक हानी झाल्याचा आरोप करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी वा त्या दरम्यान संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती, मात्र सदर बैठकीचे कार्यवृत्त अद्याप संबंधितांना उपलब्ध करून देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी संबंधित अधिकारी, तक्रारदार व विकासक यांच्यासमवेत संयुक्त बैठक आयोजित करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय, तसेच सदर विकासक कंपनीने अल्प उत्पन्न गट (LIG) व मध्यम उत्पन्न गट (MIG) यांच्यासाठी आवश्यक असलेल्या सदनिकांचे बांधकाम/वितरण केले नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने संबंधित अधिकारी व विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे. मौजे ओशिवरा, ता. अंधेरी येथील सर्व्हे क्र.४१ (भाग) मधील मे. ओशिवरा लॅन्ड डेव्हलपमेंट कंपनी प्रा.लि. यांच्या ताब्यातील ६,०८,१९६.५५ चौ.मी. क्षेत्राकरीता नागरी जमिन कमाल धारणा व विनियमन अधिनियम १९७६ मधील कलम २० खाली सुट देण्यात आलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे. सक्षम प्राधिकारी स्तरावर प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित तक्रारकर्त्यास वस्तुस्थितीबाबत कळविण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही. कलम २० च्या सुटीच्या आदेशातील मुख्य अटीनुसार प्रस्तावधीन जमिन श्री स्वामी समर्थ प्रसन्न को.हा.सो. लि. या संस्थेस किंवा संस्थेच्या उपसंस्थेस हस्तांतरीत करुन संस्थेच्या सभासदासाठी गृहबांधणी योजना राबविणे आवश्यक होते. सभासदासाठी किमान ८००० सदनिका बांधणे बंधणकारक होते, त्यापैकी ५० टक्के सदनिका ४० चौ.मी. पर्यंत व उर्वरीत ५० टक्के सदनिका ८० चौ.मी आकारमानाचे बांधणे बंधणकारक होते. सदर कलम २० खालील एकूण क्षेत्रापैकी स्वामी समर्थ प्रसन्न को.हा.सो. मधील अविकसीत

क्षेत्र १००००.०० चौ.मी. व यमुना नगर मधील ६२१८.०० चौ.मी. असे एकूण १६२१८.०० चौ.मी. क्षेत्राकरिता दिनांक २२.११.२०१२ पर्यंत दंडात्मक मुदतवाढीची कार्यवाही केली आहे. यमुना नगर मधील ६२१८.०० चौ.मी. क्षेत्राचा विकास विकासकाने मुदतीपुर्वी केलेला आहे व स्वामी समर्थ प्रसन्न को.हा.सो. मधील क्षेत्राबाबत श्री समर्थ डेव्हलपमेंट कार्पोरेशन यांनी अविकसीत ७७४७.१० चौ.मी. करिता शासन निर्णय दिनांक १.०८.२०१९ नुसार १० टक्के अधिमुल्य व दिनांक १९.०३.२०१६ ते दिनांक २७.०८.२०२१ पर्यंत दंडात्मक मुदतवाढीची रू.१०.८० कोटी इतक्या अधिमुल्याची रक्कम जमा केली आहे.

(४) अशी बाब नाही. दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी आयोजित बैठकीचे कार्यवृत्त मा. अध्यक्ष, विधानसभा यांच्या कार्यालयामार्फत तयार करण्यात आलेले आहे.

(५) हे खरे नाही. सदर भूखंडावर बांधकाम परवानगी देतांना इमारतीतील सदनिकांचे क्षेत्रफळ विहित केलेल्या आकारमानानुसार इमारतीच्या मंजुर आराखड्यात देण्यात आलेले आहे. इमारतीचा मंजूर आराखड्यानुसार सदर भूखंडावर एकूण १८६ इमारती उभारण्यात आल्या असून त्या इमारतीत ४० चौ.मी. क्षेत्रफळाच्या एकूण ५,७२९ सदनिका व ८० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या एकूण ५४८३ सदनिका अशा एकूण ११,२१२ सदनिका बांधण्यात आलेल्या आहेत. सदर सदनिकांमध्ये सद्यस्थितीत जवळपास ६०,००० रहिवाशी मागील २५ ते ३० वर्षापासून वास्तव्यास आहेत.

(६) प्रस्तुत प्रकरणी सदनिकांच्या आकारमानात फेरफार/अनियमिततेबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई करणे ही बाब अतिशय विस्तृत व व्यापक स्वरूपाची असल्यामुळे के/पश्चिम विभागामार्फत नमुन्यादाखल (Sample) व क्रमरहित (Random) स्थळ निरिक्षण करण्याकरिता एकुण १८६ इमारतींपैकी २१ इमारतींना नोटीस बजावण्यात आल्या होत्या त्यापैकी ७ इमारतींमधील स्थळ निरिक्षणाची कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे. सदर इमारतीतील ३१ सदनिकाधारकांकडून करण्यात आलेल्या वाढीव बांधकामास, अनधिकृत एकत्रिकरणास तसेच चालू बांधकामास मनपा अधिनियम, १९८८ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये नोटिस बजावण्यात आल्या आहेत. तसेच प्रस्तुत प्रकरणी मा. विधानसभा अध्यक्ष महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालय व इमारत प्रस्ताव व सहाय्यक आयुक्त, के/पश्चिम विभाग कार्यालयाकडून संयुक्त स्थळपाहणी करण्यात येणार आहे.

----------------

## नाशिक शहरातील पंचवटी, नाशिकरोड व जेलरोड येथील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(२३) * ३७३१२ ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील पंचवटी विभाग तसेच नाशिकरोड व जेलरोड परिसरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून त्यामुळे अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणावर वाढला असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ते दुरुस्तीच्या कामांदरम्यान कोणतीही पूर्वसूचना न देता थेट मोठ्या प्रमाणावर खडी टाकण्यात येत असल्याने वाहतूक कोंडी निर्माण होत असून दुचाकीस्वार घसरून अपघात होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक ठिकाणी रस्ते खोदून ते दीर्घकाळ उघडे ठेवण्यात येत असून, विशेषतः रात्रीच्या वेळी अपुऱ्या पथदिव्यांमुळे हे खड्डे वाहनचालकांसाठी जीवघेणे ठरून अपघातात ५ हून अधिक नागरिकांचे बळी गेल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून संबंधित कामांवर योग्य देखरेख न ठेवल्यामुळे व कंत्राटदारांच्या मनमानी कारभारामुळे रस्ते दुरुस्तीची कामे निकृष्ट दर्जाची व संथ गतीने होत असल्याचा आरोप नागरिकांकडून तसेच लोकप्रतिनिधी कडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने नाशिक शहरातील पंचवटी, नाशिकरोड व जेलरोड परिसरातील सर्व प्रमुख व अंतर्गत रस्त्यांची तातडीने दर्जेदार दुरुस्ती करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना (योग्य डांबरीकरण, खड्डे बुजवणे, पथदीप व्यवस्था, वाहतूक नियोजन इ.) तसेच सदर प्रकरणी संबंधित कंत्राटदार व मनपा नाशिक मधील जबाबदार अधिकाऱ्यांवर शासन स्तरावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

नाशिक शहरात पंचवटी विभाग तसेच नाशिकरोड व जेलरोड परिसरातील आगामी सिंहस्थ कुंभमेळाच्या अनुषंगाने मुख्य रस्ते नव्याने व अंतर्गत रस्ते दुरुस्ती करण्यात येत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर रस्ते दुरुस्तीसाठी खोदकाम झाल्यानंतर बॅकफिलिंग करुन खडीकरणाचे काम करण्यात येत असून सदर खडीमुळे अपघात होवू नये म्हणून मक्तेदारांना (कंत्राटदार) वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत व त्याबाबत काळजी घेण्यात येत आहे. तसेच विविध ठिकाणी ट्रॅफिक वॉर्डनची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही,

अपघात होऊन ५ हून अधिक नागरिकांचा बळी हा महानगरपालिकेच्या रस्त्यांच्या कामामुळे अथवा रस्त्यांमधील खडयामुळे गेल्याचे निदर्शनास आले नाही.

नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने खोदकाम करण्यात आलेल्या ठिकाणी बॅरिकेडिंग करण्यात आले असून, आवश्यक त्या ठिकाणी सूचना फलक लावण्यात आले आहेत. तसेच जेथे रस्त्याच्या कामासाठी ट्रॅफिक डायव्हर्जन केले आहे तेथे पोलीस विभागाकडून डायव्हर्जन प्लॅन मंजूर करून नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून अधिसूचना दैनिक वर्तमानपत्रात प्रसिद्धी देण्यात आली आहे.

(४) व (५) हे खरे नाही.

महानगरपालिकेच्या ज्या विभागाकडून रस्ते खोदकामाचे काम केले जात आहे त्या विभागाकडून योग्य देखरेख करण्यात येत असून सदर देखरेखीसाठी Project Management Consultants ची स्वतंत्र नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या गुणनियंत्रण विभागामार्फत गुणवत्ता तपासणी करण्यात येत आहे. तसेच नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने देखील गुणवत्ता तपासणीसाठी स्वतंत्र संस्थेची नियुक्ती केली आहे.

ज्या कामांना मक्तेदारांकडून (कंत्राटदार) विलंब होत आहे, त्या मक्तेदारांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येत असून सदर दंडाची रक्कम रु.१० हजार ते रु.१.०० लाख इतकी आहे.

पंचवटी, नाशिकरोड व जेलरोड परिसरातील रस्त्यांची दुरुस्तीची कामे महानगरपालिकेमार्फत सुरु असून रस्ते दुरुस्ती कामांची निविदा प्रक्रिया सुरू आहेत. विधान परिषद आचारसंहितेमुळे कामांना काहीसा विलंब झाला आहे. तरी आचारसंहिता संपल्यानंतर दुरुस्ती कामांचे कार्यारंभ आदेश (Work Orders) देऊन रस्ते दुरुस्ती वेळेत पूर्ण करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## राज्यात औषधांची बेकायदेशीर ऑनलाईन विक्री होत असल्याबाबत

**(२४) * ३५५१२ श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री व कॉर्पोरेट कंपन्यांच्या अस्वाभाविक स्पर्धेविरोधात दिनांक २० मे,२०२६ रोजी वा त्यादरम्यान देशव्यापी बंद आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ८ फेब्रुवारी २०२३ रोजी अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटना (AIOCD) यांच्यासोबत झालेल्या बैठकीत तत्कालीन केंद्रीय आरोग्यमंत्री मा. मनसुख मांडविया यांनी DCGI मार्फत सर्व राज्य औषध नियंत्रकांना ऑनलाईन औषध विक्री पोर्टल्सवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, Narcotic स्वरूपातील औषधे जसे Restyl Tablet, Corex Syrup, Termin Injection, तसेच मधुमेह व रक्तदाबावरील बनावट/डुप्लिकेट औषधे जसे Telma-AM व इतर Cardio-Diabetic औषधे आणि Pregnancy Termination Kit (Misoprost Tablet) ही औषधे डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय ऑनलाईन माध्यमातून ग्राहकांना सहज उपलब्ध होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा अनियंत्रित ऑनलाईन औषध विक्रीमुळे राज्यातील तरुण पिढीमध्ये नशेच्या औषधांचे व्यसन वाढत आहे तसेच रिटेल औषध विक्रेत्यांना शासनाने निश्चित करून दिलेले मार्जिन साधारणतः १६ ते २० टक्के इतके मर्यादित असताना ऑनलाईन फार्मसी कंपन्यांकडून २० ते ३० टक्क्यांपर्यंत सवलत (Discount) देण्यात येत असल्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील लहान रिटेल औषध विक्रेत्यांमध्ये अव्यवसायिक व असमतोल स्पर्धा निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री रोखण्यासाठी तसेच छोट्या औषध विक्रेत्यांचे संरक्षण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

औषध नियंत्रक, भारत सरकार यांनी दि.०३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सर्व राज्य औषध नियंत्रकांना मा. उच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या रिट पिटीशन क्र.११७११/२०१८ च्या दि.१२.१२.२०१८ रोजीच्या आदेशानुसार ऑनलाईन औषध विक्रीबाबत आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. तथापि, मा. उच्च न्यायालय, मद्रास यांच्या दि.२५.०६.२०२४ च्या आदेशानुसार केंद्र शासनास ऑनलाईन औषध विक्रीबाबत धोरण निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले असून परवानाधारक औषध विक्रेत्यामार्फत ऑनलाईन औषध विक्री करू शकतात, असे नमूद केले आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) हे खरे नाही.

i. औषधांच्या किंमतीवर नियंत्रण हे अत्यावश्यक वस्तु कायदा १९५५ अंतर्गत पारीत औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ द्वारा करण्यात येते या आदेशाच्या परिच्छेद २६ नुसार कोणतीही व्यक्ती ही कोणतेही औषध हे औषधाच्या अधीकतम मूल्ये (MRP) पेक्षा जास्त किंमतीने विकू शकत नाही.

ii. या आदेशानुसार राष्ट्रीय आवश्यक औषध सुची (National List of Essential Medicines) मध्ये नमूद एकूण ३८४ औषधांना अधिसूचीत करुन सदर औषधांच्या किंमती निर्धारीत केलेल्या आहेत. तसेच, जी औषधे उक्त सूचीमध्ये समाविष्ट नाहीत अशा औषधांचे अधिकतम मुल्य (MRP) मध्ये १०% पेक्षा जास्त वार्षिक वाढ उत्पादक करु शकत नाही, अशी तरतूद औषध नियंत्रण किंमत आदेश - २०१३ अंतर्गत आहे.

iii. औषधांच्या किंमतीवर देण्यात येणारी सवलत (Discount) याबाबत औषधे व सौदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५ मध्ये तरतूद नाही.

(५) अन्न व औषध प्रशासनामार्फत प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने तपासण्या करुन औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४५ व नियम, १९४५ च्या तरतुदीनुसार नियमोचित कारवाई करण्यात येते. त्यानुसार, ऑनलाईन औषधांच्या नियमबाह्य विक्री बाबत अन्न व औषध प्रशासनाद्वारे माहे, एप्रिल, २०२५ ते जून, २०२६ या कालावधीत एकूण ०९ ऑनलाईन पेढ्यांचे परवाने निलंबन/रद्द करण्यात आले आहे. तसेच, एका प्रकरणी मा.न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील केईएम रुग्णालयात रुग्णाच्या नातेवाईकांकडून**
**परिचारिका आणि सुरक्षा रक्षकांवर झालेला हल्ला**

**(२५) * ३२५८५ श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील केईएम रुग्णालयामध्ये उपचारादरम्यान रुग्णाचा मृत्यू झाल्यानंतर संतप्त नातेवाईकांकडून कर्तव्यावर असलेल्या परिचारिका व सुरक्षारक्षकांना मारहाण करण्यात आल्याची घटना दिनांक २९ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेमध्ये परिचारिका तसेच सुरक्षारक्षक जखमी झाले असून या घटनेमुळे काही काळ रुग्णसेवा विस्कळीत झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी रुग्णालयांमध्ये सुरक्षा यंत्रणा बळकट करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर घटना दिनांक २८ एप्रिल, २०२६ रोजी घडली आहे.

(२) सदर घटनेमध्ये एक परिचारिका व २ पुरुष सुरक्षा रक्षक व १ महिला सुरक्षा रक्षक यांना संबंधित रुग्णांच्या नातेवाईकाकडून मारहाण करण्यात आली. तथापि, या घटनेमुळे कोणतीही रुग्णसेवा विस्कळीत झाली नाही.

(३) याप्रकरणी संबंधित मारहाण करणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांविरुद्ध दिनांक २८ एप्रिल, २०२६ रोजी भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई येथे भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात पोलीस यंत्रणेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुमसर (जि.भंडारा) नगर परिषदेमध्ये बनावट कॅटरिंग देयकाच्या माध्यमातून झालेला आर्थिक गैरव्यवहार

**(२६)** * **३२९५८ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) नगर परिषदेमध्ये नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागातील एका लिपिकामार्फत अस्तित्वात नसलेल्या जयश्री कॅटरिंग सर्व्हिस, तुमसर या नावाने लाखो रुपयांची बनावट देयक मंजूर करून आर्थिक गैरव्यवहार करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित लिपिकाने स्वतःच्या अंगत पंगत हॉटेलच्या नावाने सुमारे ३.२० लाख रुपयांची देयक मंजूर करून घेतल्याचे तसेच निविदा प्रक्रियेचे नियम डावलून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मूकसंमतीने निधी वळविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, विशेष चौकशी समिती (SIT) मार्फत चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक सन २०२५ अंतर्गत जेवण व्यवस्था करणे या कामाकरिता जयश्री केटरिंग सर्व्हिस यांच्याशी करारनामा करुन कार्यादेश देण्यात आलेले होते.

नगर परिषद, तुमसर येथे उपलब्ध अभिलेख, लेखापरीक्षण नोंदी, देयक मंजुरी प्रक्रिया तसेच संबंधित शाखेकडील कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली असता "जयश्री केटरिंग सर्व्हिस" यांच्या नावाने बनावट बिले सादर करुन आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे प्रथमदर्शनी कोणतेही ठोस पुरावे दिसून येत नाही.

(२) हे खरे नाही.

नगरपरिषदेने कळविल्यानुसार हॉटेल अंगत पंगत यांच्याशी नगरपरिषदेचा कोणताही करार झालेला नसून त्यांच्या नावाने कोणतेही देयक अदा करण्यात आलेले नाही. आवश्यक कागदपत्रांच्या आधारे नियमानुसार जयश्री केटरिंग सर्व्हिस यांच्या नावे बिल अदा करण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकरणातील तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विशेष त्रिसदस्यीय चौकशी समिती दिनांक ०६.०५.२०२६ रोजी गठीत करण्यात आली आहे. विशेष चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## राज्यात व्यावसायिक सिलिंडरच्या दरात झालेल्या वाढीबाबत

**(२७)** * **३३७९१ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किंमतीत दिनांक १ मे, २०२६ रोजी एकाच दिवसात तब्बल ९९३ रुपयांची विक्रमी दरवाढ करण्यात आली असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १९ किलोंच्या व्यावसायिक सिलिंडरचा दर आता थेट ३,२४८ रुपये झाल्याने हॉटेलमधील जेवणासह रेस्टॉरंट आणि टपरीवरील सामान्यांचा नाश्ता, पोहा, चहा आणि नियमित थाळी यांच्या दरात वाढ होणार

असल्याने सिलेंडरचे दर कमी करण्याची मागणी हॉटेल अँड रेस्टॉरंट ओनर्स असोसिएशनने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वडापाव, समोसा विक्रेते आणि छोट्या गाड्यांवरील व्यावसायिकांना वाढत्या खर्चामुळे व्यवसाय करणे कठीण झाले असून, ५ किलोच्या छोट्या व्यावसायिक सिलिंडरमध्येही २६१ रुपयांची वाढ झाल्याने गरीब कष्टकरी वर्गावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे अनेक व्यावसायिकांनी पुन्हा कोळशाच्या शेगडया व चुलीकडे वळण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने हॉटेल अँड रेस्टॉरंटला पुर्वी प्रमाणेच गॅसचे दर कायम ठेवून वितरकांकडून वेळेत गॅसचा पुरवठा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) केंद्र शासनाने मे, २०२६ मध्ये व्यावसायिक १९ किलोग्रॅम सिलेंडरच्या किंमतीमध्ये ९९३ रुपये वाढ करुन सदर सिलेंडरची किंमत रु. ३०२४ इतकी केली आहे.

(२) जून २०२६ मध्ये १९ किलोच्या व्यावसायिक सिलेंडरचा दर रु. ३०६७ झाला आहे.

(३) ५ किलोच्या छोट्या व्यावसायिक सिलेंडरचा दर मार्च २०२६ मध्ये रु. ३१७.५ एवढा होता. तर जून २०२६ मधे सदर सिलेंडरचा दर रु. ३४९.५ एवढा झाला आहे.

(४) अंशत: खरे आहे. काही ठिकाणी सदर बाब निदर्शनास आली आहे.

(५) व्यावसायिक व घरगुती गॅसचे दर निश्चित करणे या बाबी केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहेत. जागतिक युद्धजन्य परिस्थितीमध्ये महाराष्ट्र राज्यातील एलपीजी गॅस सिलेंडरचा पुरवठा नियमित ठेवण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी दिनांक १३.०३.२०२६ च्या शासन परिपत्रकान्वये सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समृद्धी महामार्गावर जालना जिल्ह्यातील कडवंचीजवळ झालेल्या भीषण अपघातात महिला सफाई कामगारांचा झालेला मृत्यू

**(२८) * ३६५४७ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समृद्धी महामार्गावर जालना जिल्ह्यातील कडवंचीजवळ चॅनल क्र. ३५२ वर महामार्गाची दैनंदिन साफसफाई करणाऱ्या ८ महिला मजुरांना एका भरधाव कंटेनरने चिरडल्यामुळे त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून इतर ३ जण गंभीर जखमी झाले असल्याचे दिनांक १ एप्रिल, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समृद्धी महामार्गावर यापूर्वी दिनांक ६ मार्च, २०२६ रोजी करमाडजवळ रस्ता दुरुस्ती करणाऱ्या ३ कामगारांचा असाच वाहनाखाली चिरडून मृत्यू झाला असतानाही, महामार्ग प्रशासनाने रस्त्यावर काम करणाऱ्या कामगारांच्या व मजुरांच्या सुरक्षेसाठी कोणतीही कठोर सुरक्षा नियमावली (Safety Protocol) लागू केलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महामार्गावर धावणाऱ्या वाहनांचा अतिवेग (Overspeed) आणि चालकांचा थकवा/झोपेची डुलकी यांमुळे हे अपघात वारंवार घडत असून, 'ओव्हरस्पीड' वाहनांवर नियंत्रण ठेवण्यात आणि हायवे पेट्रोलिंग यंत्रणा प्रभावीपणे राबविण्यात महामार्ग पोलीस अपयशी ठरले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, समृद्धी महामार्गावर काम करणाऱ्या हजारो कंत्राटी कामगारांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी शासन संबंधित कंत्राटदार कंपन्यांना ‘बॅरिकेडिंग’ व ‘स्पीड कंट्रोल रडार’ अनिवार्य करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने अपघातातील मृत महिलांच्या कुटुंबांना शासनातर्फे घोषित ५ लाखांच्या मदतीव्यतिरिक्त कंत्राटदार कंपनीकडून अतिरिक्त आर्थिक नुकसान भरपाई व जखमींना मोफत उपचार मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

समृध्दी महामार्गावर प्रत्यक्षात काम करतेवेळेस संबंधित कंत्राटदार महामार्गावर काम करणाऱ्या कामगारांच्या व मजुरांच्या सुरक्षेसाठी IRC ५५ नुसार उपाय योजना करुन काम करण्यात येते. ज्यामध्ये सेप्टी झोन तयार करुन बॅरिकेटींग करणे, सेप्टी कोन लावणे, सुचना फलक लावणे, ब्लिंकर्स लाईट इ. चा समावेश असतो.
(३) हे खरे नाही.

समृध्दी महामार्गावर ठिकाठिकाणी वेगवेगळया वाहनांची वेगमर्यादा दर्शक फलके लावण्यात आली आहेत. तसेच, महामार्ग पोलीसांमार्फत व आर.टी.ओ.मार्फत वाहतूक विभागाच्या नियमांचे उल्लंघन होऊ नये यासाठी सुरक्षिततेच्या दुष्टीने वाहनचालकांना वेळोवेळी समुपदेशन केले जाते. तसेच आरटीओमार्फत इंटरसेप्टर व्हेईकल (Interceptor Vehicle) द्वारे वाहनांचा वेग मोजून, वेग मर्यादा न पाळणाऱ्या वाहन चालकांवर दंड आकारणी करून रस्त्यांवर वेग नियंत्रित करण्यात येतो.
(४) हे खरे आहे.

समृद्धी महामार्गावर रहदारी आणि घटना नियंत्रणासाठी इंटेलिजंट ट्रान्सपोर्टेशन सिस्टीम ( ITS) स्थापित केली जात आहे. ज्यामध्ये वाहनांचा वेग निश्चित होऊन वेगमर्यादा ओलाडणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
(५) अपघातामध्ये शासनाच्या मदतीव्यतिरिक्त कंत्राटदार कंपनीकडून मृतांच्या कुटुंबीयांना १५ लाख रुपये व गंभीर जखमी कामगारांना ४ लाख व किरकोळ जखमी कामगारांना २ लाख रुपयापर्यंत आर्थिक सहाय्य करण्यात आलेले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयांमधील तोतया (बोगस) डॉक्टर पुरविणाऱ्या संस्था आणि कंत्राटदारांवर कारवाई करणेबाबत

**(२९) * ३२७५० श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सांताक्रुझ येथील व्ही.एन.देसाई रुग्णालयाच्या १० खाटांचा अतिदक्षता विभागात साई संजीवनी नर्सिंग होमने नियुक्त केलेल्या एका डॉक्टरांच्या शैक्षणिक अर्हतेसंदर्भात प्रश्नचिन्ह उपस्थित झाल्यानंतर कागदपत्रांची

महाराष्ट्र वैदयकीय परिषदेने पडताळणी केली असता डॉक्टर बनावट असल्याचे माहे मे,२०२६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयासह तसेच इतर काही रुग्णालयांमध्ये कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या डॉक्टरांपैकी काही डॉक्टरांची कागदपत्रे बनावट असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित तोतया (बोगस) डॉक्टर उपलब्ध करून देणाऱ्या कंत्राटदाराविरुद्ध एक वर्ष उलटल्यानंतरही कोणतीही प्रशासकीय अथवा फौजदारी कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित रुग्णालयातील अतिदक्षता विभागामध्ये (ICU) उपचार घेतलेल्या ६९७ रुग्णांपैकी २१२ रुग्णांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले असून या मृत्यूंचे वैद्यकीय लेखापरिक्षण अद्याप पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाच्या आणखी सुमारे ४० संशयित अथवा तोतया (बोगस) डॉक्टरांची प्रकरणे निदर्शनास आली असून त्यांच्या शैक्षणिक व नोंदणी कागदपत्रांची पडताळणी अद्याप अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच जीवनज्योत ट्रस्टने अनेकदा अटीशर्तीचे उल्लंघन केले असून महापालिकेच्या रुग्णालयात बोगस डॉक्टर पुरविल्याचे सिध्द होवून काळया यादीत टाकण्यात आलेले असतांनाही या ट्रस्टची कोट्यवधी रुपयांची प्रलंबित बिले काढण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन संबंधित कंत्राटदार, अधिकारी व तोतया (बोगस) डॉक्टरांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या व्ही.एन.देसाई या सर्वसाधारण रुग्णालयात पुरवठादार मे.साई संजीवनी पॉलिक्लिनिक अँड नर्सिंग होम, मुंबई यांनी अर्हताप्राप्त डॉक्टर उपलब्ध करुन दिला नसल्याचे प्राप्त मौख्यिक तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी केली असता माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले. त्याअनुषंगाने महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांच्याकडून दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजी रुग्णालयास अहवाल प्राप्त झाला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने ११ उपनगरीय रुग्णालयात कंत्राटी पद्धतीने अतिदक्षता विभागात डॉक्टरांच्या सेवा उपलब्ध करुन घेतल्या होत्या. त्यापैकी व्ही.एन.देसाई रुग्णालय, सांताक्रुझ येथे २ डॉक्टरांची व भगवती रुग्णालय, बोरीवली येथे १ डॉक्टरांची पदवी परदेशी वैद्यकीय पदवी असल्याचे तसेच संत मुक्ताबाई रुग्णालय, घाटकोपर येथे १ डॉक्टरांची पदवी बी.एच.एम.एस. (BHMS) असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) हे खरे नाही.

व्ही.एन.देसाई रुग्णालय, सांताक्रुझ, भगवती रुग्णालय, बोरीवली व संत मुक्ताबाई रुग्णालय, घाटकोपर यांचेकडे नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदारांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांची सेवा खंडीत करण्यात आल्या आहेत. तसेच, अधिदानासाठी त्यांची देयके रोखून ठेवण्यात आली आहेत व सदर कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.

माहे सप्टेंबर, २०२५ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ११ उपनगरीय रुग्णालयात अतिदक्षता विभागातील बाह्यस्त्रोतीकरणाने घेण्यात येणाऱ्या सर्व सेवा बंद करण्यात आल्या आहेत.

(४) हे खरे नाही.

रुग्णांचा मृत्यू नैसर्गिक असून त्याबाबत तक्रार प्राप्त न झाल्याने वैद्यकीय ऑडिट करण्यात आलेले नाही.

(५) हे खरे नाही.

बाह्यस्त्रोताद्वारे उपलब्ध करुन घेण्यात येणाऱ्या डॉक्टरांच्या सेवा माहे सप्टेंबर, २०२५ पासून बंद करण्यात आल्या आहेत.

(६) हे खरे नाही.

मे.जीवनज्योत चॅरिटेबल ट्रस्ट यांनी अपुरे डॉक्टर्स पुरविणे तसेच त्यांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसीबाबत समाधानकारक उत्तर न देणे इत्यादी कारणाने त्यांना दिनांक ५ जुलै, २०२३ रोजीच्या आदेशान्वये काळ्या यादीत टाकल्यानंतर त्यांची देयके रोखून ठेवण्यात आली आहेत. तसेच बँक गॅरन्टी, अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात आलेल्या आहेत.

(७) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ४ उपनगरीय रुग्णालयात नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदारांना कारणे दाखवा नोटीस बजावून सेवा खंडीत करण्यात आल्या, अधिदानासाठी त्यांची देयके रोखून ठेवण्यात आली. तसेच सदर कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.

माहे सप्टेंबर, २०२५ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ११ उपनगरीय रुग्णालयात अतिदक्षता विभागातील बाह्यस्त्रोतीकरणाने घेण्यात येणाऱ्या सर्व सेवा बंद करण्यात आल्या आहेत.

-----------------

**राज्यातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याच्या धोरणामध्ये बदल करण्याबाबत**

**(३०) * ३२५८८ श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.तुकाराम काते (चेंबूर), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याच्या धोरणामध्ये बदल करून मोठ्या ग्रामपंचायत व नागरी क्षेत्रांतील विखुरलेल्या घरांसाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या धर्तीवर सामूहिक घरे योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, म्हाडाच्या जागेवरील अतिक्रमणांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरे उपलब्ध करून देण्यास तसेच संबंधित जागा स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०११ पर्यंत अस्तित्वात असलेल्या अनधिकृत निवासी बांधकामांना काही अटींवर नियमित करण्याचा निर्णय घेतला असताना नदीपात्र, नाले, गायरान, सार्वजनिक रस्ते, वने व आरक्षित जागांवरील अतिक्रमणे नियमित न करण्याची भूमिका शासनाने घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर धोरणाची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने अशा अपात्र अतिक्रमणधारकांना प्रधानमंत्री आवास योजनेतून पर्यायी निवास उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) राज्य शासनाने गृहनिर्माण धोरण दिनांक २३ जुलै, २०२५ रोजी प्रसिध्द केले आहे. सदर धोरणात एका प्रभागात दोन किंवा अधिक झोपडपट्ट्या असल्यास त्या समूह विकासासाठी एकत्रित करण्यास परवानगी देता येईल, अशी शिफारस केली आहे. त्यानुसार बृहन्मुंबईमध्ये समूह पुनर्विकास योजना राबविण्याचा शासन निर्णय दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

शासकीय जमिनीवर निवासी प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणे नियमित करण्यासाठी महसूल व वन विभागाने दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यामध्ये ज्या शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करणे शक्य नाही, अशा ठिकाणच्या अतिक्रमणधारक पात्र कुटुंबाच्या याद्या तयार करुन त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेतून घरे उपलब्ध करुन देण्याबाबतच्या सूचना निर्गमित केल्या आहेत.

तथापि, म्हाडाच्या अतिक्रमित जागेवर प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुले उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) महसूल व वन विभागाच्या दिनांक २५ मार्च, २०२६ च्या शासन निर्णयात, नदी, नालेच्या पूररेषेतील अतिक्रमणे, वन, सीआरझेड, एनडीझेड, रेल्वे मार्ग, महामार्ग, विद्युत वाहिन्या इत्यादी अतिक्रमणे नियमानुकूल न करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, अशा अतिक्रमित जागेवरील सर्व पात्र कुटुंबे निवाऱ्यापासून वंचित राहू नये, यासाठी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी अशा सर्व पात्र कुटुंबांची गावनिहाय यादी करुन त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेतून घरे उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.